# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | बारावे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४४ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : १६४**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष बारावे / अंक १ / एप्रिल २०११

## संपादकीय

## लढ्यांची शोकांतिका

मंगळवार दि. ५ एप्रिल २०११ रोजी समाजसुधारक श्री. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराविरोधी चळवळीचा एक भाग म्हणून दिल्ली येथील जंतरमंतर मध्ये बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. स्वत: अण्णा हजारे यांनी हा स्वातंत्र्याचा दुसरा लढा असल्याचे प्रतिपादन केले. वृत्तपत्रांपासून दूरदर्शनपर्यंतची सर्व माध्यमे, आणि अशा कुठल्याही चळवळीमध्ये दिसणाऱ्या अग्निवेशांपासून मेधा पाटकरांपर्यंत, नेहमीच्या 'यशस्वी कलाकारांनीही' या चळवळीला पाठिंबा दिला. आपण इतिहासापासून काही शिकत नाही हेच खरे!

सुमारे दीडशे वर्षे चाललेल्या व अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या स्वातंत्र्य लढ्याचे अवघ्या साठ वर्षांत आपण 'खोबरे' केले. श्री. जयप्रकाश नारायण यांनी ३०-३५ वर्षांपूर्वी 'संपूर्ण क्रांती'च्या दिलेल्या नाऱ्याचेही आपण गेल्या तीस वर्षांत 'वाटोळे' केले. इंदिरा गांधींची एकाधिकारशाही यातून संपुष्टात आली. ही या चळवळीची जमेची बाजू, पण लगेचच गांधी नेहरू कुटुंबाची घराणेशाही, लोकशाहीच्या शिक्का मोर्तबानिशी आपण कायमची स्वीकारली.

प्रचंड सभा व त्यामध्ये दिलेली घणाघाती भाषणे, रस्त्यांवरील मोर्चे, पथनाट्ये, घोषणाबाजी ही चळवळीला 'उत्तेजित' करणारी साधने असली तरी ती 'शाश्वत' विचार अंगवळणी पडल्याचे 'मोजमाप' होऊ शकत नाहीत. सत्य, अहिंसा, सहिष्णुता, समानता या कुठल्याच संकल्पना नवीन नाहीत; पण त्यांचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक 'धंदा' मात्र नवीन आहे. 'जातीयवाद' हे याचे चांगले उदाहरण आहे. सर्व राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणुकीतील यशासाठी जातींचा निर्लज्ज वापर केलेला आपण बघतो आहोत. भारत हा एकच असा देश असेल की जेथे 'मागासले'पण जाहीर करण्याकरता राजकीय नेत्यांमध्ये स्पर्धा चालू आहे. जातींच्या आधारावर आरक्षणांचा वर्षाव करणारे नेतृत्व, 'पुरोगामी' कसे ठरते हे एक मोठे कोडे आहे.

राजकीय नेत्यांचा 'भ्रष्टाचार' चघळताना प्रत्येकाला एक विलक्षण 'आनंद' मिळत असतो. पण हा राजकीय नेता आपणच निवडून दिलेला असतो, याचा प्रत्येक व्यक्तीला 'सोईस्कर' विसर पडतो. जे जातींचे आहे तेच राजकीय गुन्हेगारीचे आहे. लोकशाहीचे सर्वांत पवित्र स्थान म्हणजे लोकसभा. नुकत्याच केलेल्या पाहणीनुसार या लोकसभेत निवडून आलेले २५ % सभासद हे गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे आढळून आले आहे. याहून आधिक कुठली मोठी लोकशाहीची थट्टा असेल? 'यथा प्रजा तथा राजा' अशी एक जुनी म्हण आहे. हे जर का खरे असेल, तर 'प्रजा' काही आत्मपरीक्षण करायला शिकणार आहे की नाही? भ्रष्टाचार हा रोग नाही, तर एका मूल्यहीन, चरित्र्यहीन, स्वार्थलोलुप, लाचार अशा सडलेल्या

(पृष्ठ ३७ वर)




**वर्ष बारावे / अंक १ / एप्रिल २०११**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ६ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्मरणयात्रा | - डॉ. प्रदीप कर्णिक | ३ |
| २) | श्रीमत् आद्य शंकराचार्यकृत विवेकचूडामणि | - श्री. शं. बा. मठ | ७ |
| ३) | सन्मित्रची ६० वर्षांची वाटचाल | - -- | १८ |
| ४) | 'सन्मित्र'- मनोगत | - सौ. तनुजा वि. जोशी | २० |
| ५) | 'वैष्णवांचा मेळा' संतचरित्रांचा मर्मग्राही परिचय | - श्री. मोहन पाठक | २१ |
| ६) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | - श्री. यशवंत साने | २३ |
| ७) | अध्ययन अक्षमता आणि पालकत्व | - श्री. मोहन पाठक | २८ |
| ८) | परिसर वार्ता | - संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा आणि स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून, संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# स्मरणयात्रा

आकाशवाणीच्या अस्मिता नाहिनीच्या सौजन्याने आकाशवाणीवरून प्रसारित झालेली ही मुक्त विचार ललित स्पंदने दिशाच्या वाचकांसाठी देत आहोत. – संपादक

## हळवा चंद्र–१

रात्री आपण झोपतो तेव्हा नेमके काय विचार असतात मनात! येतात! येत राहतात! विचार थांबतात आणि आपण झोपेच्या आधीन होतो, तो क्षण पकडता येतो? आठवता येतो! त्याचं होतं आपल्याला स्मरण! इतकं कुठलं, कुठलं बारीक –सारीक आठवणारं, आठवून आनंदणारं किंवा स्वतःलाच छळणारं आपलंच मन आपल्याच आतल्या आतल्या आठवणी, अगदी नेमकी आठवण काढावी, तशा लख्ख मनात जाग्या होतात, पण झोपेचा क्षण नाही स्मरता येत आपल्याला. इतकं सारं आपण कसं स्मरतो? कशा जाग्या होतात आठवणी? का? त्याला कारण घडतं का? सकारण व अकारणही स्मरण जागं होतं ते का?

बिछान्यावर पाठ टेकली की किती क्षण आपण विचार करतो? ते काय असतात? दिवसभराचे, मागच्या दिवसांचे किंवा पुढच्या भवितव्याचे. विचार असतातच, नसतात असं मात्र होत नाही, ते का? सकाळी जाग येते ती का? कोण उठवतं आपल्याला झोपेतून? नाहीच जाग आली तर? सकाळी जाग येण्याची ‘कृपा’ कोण करतं? कोणामुळे येते आपल्याला जाग? विसरलेल्या साऱ्या जगातून आपण पुन्हा त्याच स्मरणांसह परत येतो, त्या अलौकिक क्षणांचा निर्माता कोण? असते आपल्याला त्याची दाद! असतं त्याचे स्मरण! असते त्याची कृपेची आठवण? म्हणून एक अत्यंत थोर कवी असं म्हणतात–

‘‘तव कृपेच्या गारव्याचे भान हळवा चंद्र झाले ।
कस्तुरीच्या पावलांनी चांदणे हृदयात आले ।।’’

‘कृपेचा गारवा’ हा थोर विसावा असतो. ही सुखद, मुलायम, कोमल, अलवार, प्रेमळ, लोभस ‘कृपा’ ज्याला लाभते, त्याचे सारे उन्हाळे ‘गारव्याचे’ होऊन जातात, पण ही कृपा का अशी पंक्तीभेट, प्रपंचभेट करणारी असते? कृपा अथांग, अमर्याद, आसमंतभर, सर्वत्र, सर्वकाळी पसरलेली असते. तिला कोणीच परकं नसतं नि कोणीच आपलं नसतं. सर्वांवर कृपेची पखरण करणं हेच तिचं कार्य असतं. हाच त्या कृपेश्वराचा विसावा असतो. हेच त्यांचं आनंदनिधान असतं. आपल्याला ते ओळखता मात्र यायला हवं. रोज सकाळी ही कृपा आपल्याला त्या सुखद ‘गारव्या’ ने जागं करते, आपण जागं होतो. आणि आपल्याला काय आठवतं? झोपेतून उठल्या उठल्या काय असतात विचार? काय आठवत आपल्याला? कचेरीतली कामं, घरची कामं, बस, रेल्वे यांच्या वेळा. उशीरा उठल्या उठल्या बद्दलचा पश्चाताप. शिव्या, चिडचिड, राग, घुसमट, हेवे–दावे, मुलांची भांडण, आजची चिंता, पैशाची चणचण, कर्ज, आजार, बॉसचा दुस्वास, चढाओढ, सपर्धा, खेटे, काय नि काय. आपण एका महान विस्मरणाच्या जगातून स्मरणाच्या जगात येतो, ते हे आठवायला? पण आपण सवयीचे गुलामच असल्याने, आपणा कोणाचाच त्याला इलाज नसतो.

‘कृपेच्या गारव्याचे भानच आपण स्मरू शकत नाही, तर मग आपल्या आयुष्यात त्या कृपेच्या गारव्याचा ‘हळवा चंद्र’ यावा कसा?

चंद्र म्हणजे शीतलता. चंद्र म्हणजे रात्रीची कोमलता. चंद्र म्हणजे स्वप्न. चंद्र म्हणजे शुभ्र प्रकाश. तेजाचा सुवास. मेघांचा दिमाख. प्रेमाचा पोषाख. शीतल

कृपेचा संपूर्ण चकोररूपी पसरलेला अवकाश. होता येईल आपल्याला त्या कृपेचा चकोर पक्षी? पिता येईल तो शीतल प्रकाश? जगवता येतील ते प्रकाशधारांचे क्षण?

असं प्रथम भान यायला हवं. मग त्याचा चंद्र होणार. म्हणजे कलेकलेनं तो वाढणार'. पुढे तो 'हळवा' कधी नि कसा होणार?

**कस्तुरी पावलं-२**

माणसं मुळातच हळवी असतात. अगदी कोरडा, ठणठणात म्हणून प्रसिद्ध असणारा माणूसही मनाच्या कोपऱ्यात खूप खूप हळवा असतो. दुसऱ्यांसाठी नसला तरी, स्वतःसाठी तरी तो असतोच असतो. फक्त त्याला हळवेपणाचं प्रदर्शन आवडत नाही इतकंच! त्याचा हळवेपणा तो जपतो. दाखवत नसला तरी तो ते 'हळवेपण' स्मरत असतो. हे 'स्मरण' ही एक अशी देणगी माणसाला लाभली आहे की, त्यात आपण आपलं काय काय साठवून ठेवतो, दडवून ठेवतो, पढवून ठेवतो, जपून ठेवतो. माणसाला स्मरण नसतं तर! कुठे ठेवला असता जपून नात्यांचा गुंता, काळज्या नि चिंता? कुठे ठेवला असता शृंगार, झंकार नि त्यांचेच झालेले विकार? स्वीकार, नकार नि होकार? प्रेम, द्वेष, मत्सर, लोभ सारं सारं राहातं स्मरणात. एखाद्या ओल्या संध्याकाळी आपण 'आर्त' होतो ते का? हळव्या स्मरणांनी की स्मरणांतील हळव्या क्षणांनी? कधी सकाळी जाग येते तीच हळवे होऊन. ती का?

महान थोर कवींच्या आयुष्यात असणाऱ्या 'कृपे' च्या भानामुळे, त्यांचं सारं 'भान', सारं स्मरणच हळवं झालयं आणि हा हळवेपणा चंद्राचं आगमन आकाशात नैसर्गिकपणं व्हावं तसा आलाय म्हणून ते म्हणतात,

'तंव कृपेच्या गारव्याचे भान हळवा चंद्र झाले।''

आणि कृपेचा चंद्रच 'हळवा' होऊन त्यांच्या हृदयारूपी आकाशात उगवून आलाय.

आणि चंद्र कधीच एकटा नसतो. स्मरण कधीच एकटं नसतं. स्मरणाची साखळी असते. एकमेकांचा एकमेकांवर प्रकाश झोत पडत असतो. एकामुळे दुसरे व दुसऱ्यामुळे तिसरे स्मरण उजळून निघते. ते कधी सतावते. कधी का, आपल्या आयुष्यातली स्मरण शृंखला आपल्याला नेहमीच सतावत राहते. छळत राहते. दटावत राहते. त्रास देते. नको नकोसे करते. आनंदाची स्मरणयात्रा कधी कधीच होत असते. 'नको नकोशा आठवणींची मनास खंती' नकोच असं वाटत राहतं, पण 'कृपेच्या गारव्याचं' भानच आपण हरवून बसलोय. नव्हे, ते आपल्याला माहीतच नाही. आपल्या ते गावीच नाही. नाही तर त्यांचा 'हळवा चंद्र' आपल्याही आयुष्यात नाही का उगवणार? 'कृपेच्या गारव्याचे' भान हळवा चंद्र' झालेल्या कवीच्या हृदयात, 'चांदणे' त्याच्या जोडीने, हळव्या चंद्राच्या ओढीने न यावं तरच नवलं. चांदणं हृदयात आलं आहे, पण कसं आलय! हृदयात, मनात काही येतं ते कसं येतं हो? जाणवतच नाही, कळतही नाही आणि अचानक, बेसावध क्षणी नेमकं येऊन उगवतं! स्मरत राहातं.

म्हणून कवी म्हणतात,

''कस्तुरीच्या पावलांनी चांदणे हृदयात आले।।''

प्रत्येकाच्या हृदयात, मनात येणारी स्मरणयात्रा कोणत्या पावलांनी येईल त्याचा काही भरोसा नाही. 'दवात भल्या पहाटे' उगवणारे स्मरण असो, किंवा 'माती गंधित करणारी' चाहूल असो, वा 'तरल पावलांची शोभा पेरीत' येणारी प्रसन्न सकाळ असो, स्मरणयात्रा हळूच सुरू होते, सुरूच राहते.

कवीच्या हृदयात हळव्या झालेल्या चंद्राबरोबर चांदणंही आलंय, पण कसं, तर 'कस्तुरीचं एक मोठ रहस्य असतं. ज्या हरणाच्या बेंबीत कस्तुरी असते, त्याला त्याचा परिमळ प्रचंड बेचैन करतो, पण तो कुठून येतोय, ते मात्र त्याला सापडत नाही आणि तो सारखा पळत राहतो. त्या गंधाच्या शोधात. 'तुझ आहे तुजपाशी'चीच अवस्था.

एकदा का कृपेचं भान आलं की कस्तुरी पावलांनी आपल्याच हृदयात असणारी चांदणी, अधिक भाग्य असेल तर चांदण्या, लुकलुक् लागतात. सारी कृपाच कस्तुरीमय होते मात्र कस्तुरीच्या शोधात 'तो' परम भाग्यवान पळत राहतो. शोधत राहतो.

**चंदनी पौर्णिमा-३**

कृपेचा गारवा कस्तुरी पावलांनी आपल्याही आयुष्यात सकाळच्या अति अल्हाददायक पुनर्स्मरणात येऊ शकतो. मात्र तो सण, तो दिवस किंवा ते आयुष्य जर पकडता आलं, तर हृदयातलं चांदणं, तो कृपेच्या भानाचा हळवा चंद्र, पौर्णिमेकडे वाटचाल करू शकतो. कृपेची पौर्णिमा प्रत्येकाच्या आयुष्यात यायची असते, येणारही असते, पण आपण सकाळी उठतो, ते कोणतं स्मरण करत? कोणती आठवण काढत?

'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' अस श्री स्वामी रामदासांनी सांगूनही, आपल्याला स्मरण कोणतं होत? स्वप्नांच्या दृश्याचा परिणाम राहूनच कधी आपण जागे होतो, तर कधी आदल्या दिवशीची चिंता, कटकट, भांडण-झगडाच उठता क्षणी आठवतो. त्रासिक चेहरा, कंटाळवाणी मरगळ, चिंतेची न संपलेली नशा, कामाचा हँगओव्हर, काय स्मरतं प्रथम तेच आठवत नाही, पण दिवसाचा सूरच बेसूर लागतो. देवपूजेच्या सहाणे वर चंदनाच खोड दररोज उगाळूनही, आयुष्यातला 'चंदनाचा गंध'च उडूना जातो. धुंद चांदण्यारात्रीचा दरवळलेला 'अमृताचा स्वाद' आठवू म्हणता आठवत नाही. आपण सकाळी सकाळीच चिडचिडे होतो. इतरांनाही करतो. दिवसच सारा चिडीचिप चिडचिडा बनतो.

मात्र कृपेचा गारवा कस्तुरी पावलांनी हृदयात आलेले सदेह महान कवी असं पुढे म्हणतात की,

''चंदनी त्या पौर्णिमेला अमृताचा स्वाद होता।
श्वासनृत्ये लोपलेला विश्वव्यापी स्पंद होता।।

पौर्णिमा म्हणजे वाढीचं पूर्णत्व. संपूर्ण उजळलेलं शीतलत्व. व्यापकतेचा प्रकाश. त्याचंच सारं आकाश. वाढीचा अंतिम विस्तार. आणि तरीही पुन्हा कले कलेनं येणाऱ्या क्षयाचा स्वीकार. पौर्णिमा म्हणजे प्रत्येकाच्या सुखदुःखाचं मूर्तिमंत प्रतीक कलेकलेने वाढणारं, थोडं स्थिरत्व येतयं तोच पुन्हा कमी होणार असल्याची जाणीव म्हणजे पौर्णिमा. असा वाढ विस्तार पूर्णत्व आणि लोप, पुन्हा आगमन, वाढ, विस्तार, पूर्णत्व आणि लोप असा खेळ चालूच राहणार, हे सांगणारी पौर्णिमा दिसते आपल्याला? कळते आपल्याला? जाणवते? समजते? भावते? रुचते? स्वीकारता येते? जेव्हा ती तिच्या क्षयत्व-विस्तारासह येते ज्याला स्वीकारता, त्याची पौर्णिमा 'चंदनी' होते.

चंदन गंधित खरं पण तितकंच त्याचं शीतलत्वही मोठं. पौर्णिमा शीतल, स्वच्छ, पांढरी शुभ्र आणि त्यात ती चंदनी. म्हणजे शीतलत्वावर शीतलतेचा गंधित लेप जणू. पूर्णत्वाचं दुपेडी शीतलत्व म्हणजे चंदनी पौर्णिमा. लयाची धास्ती नाही. पूर्णत्वाचा अहंकार नाही. केवळ निर्मळ, निर्मम पूर्ण शीतलत्व. सर्वांसाठी. कोणासाठी. जो पाळील. तो घेईल.

अशा दुपेडी शीतल चंदनी पौर्णिमेला 'स्वाद' ही आहे. आणि तो स्वाद कुठला तर 'अमृता' चा. अमृताचा स्वाद कसा असतो? आपण कुठे घेतलाय? मुळात अमृत तरी कुठं पाहिलंय? पण जर सापडलं, गवसलं तर त्याला असेल स्वाद? घेता येईल? अमरत्वाची ग्वाही देणारं स्वादिष्ट अमृत पौर्णिमेला, आणि त्यातही त्या 'चंदनी पौर्णिमेला' पाझरत असेल काय?

जरुर असेल. शीतलत्त्वाचं महत्त्व आयुष्यात पटायला हवं. त्या शीतल चांदण्यात विचार आचारामधल्या प्रेमाचा माणुसकीचा आणि आपुलकीचा चंदनी चंद्र पूर्णत्वाला जायला हवा, मग आपल्या श्वासालाही, अमृताचा, चंदनाचा स्वाद येईल. तो आपला आपल्यालाच जाणवू लागेल.

**श्वासनृत्ये–४**

कितीतरी माणसं, संस्था, वस्तू आयुष्यात येतात नि जातात. येण्याची व जाण्याची मोजदाद ठेवणाराही कधी तरी एक दिवस निघून जातो, पण त्या मोजदाद करणाऱ्याच्या आयुष्यात एकच आणि केवळ ऐकमेव गोष्ट शेवटपर्यंत राहते. ती कधीच त्याला सोडून जात नाही, आणि जेव्हा सोडून जाते तेव्हा ती देहच उतर नाही. ती एकमेवाद्वितीय गोष्ट म्हणजे प्रत्येकापाशी प्रत्येकाचा देह चालत राहणारे 'श्वासनृत्य'. हे नृत्य जेव्हां थांबते तेव्हा सारा आयुष्याचा साजशृंगार लोप पावतो. निघून जातो.

हे श्वासनृत्य सकाळ, रात्र, दुपार, झोप, स्वप्न, अपघात, भांडण, आनंदोत्सव काहीही चालू असू दे, ते चालूच असते. ते चालू आहे याची जाणीवही आपण ठेवीत नाही. ठेवायची गरजच वाटत नाही. रागावतो, संतापतो, तेव्हा नृत्याचं 'तांडव नृत्य' होतं. आनंदून जातो तेव्हा त्याचं 'धारानृत्य' होतं. या नृत्यात भावना–विचारांबरोबर कधी मोर नाचतो, तर कधी पाखरं उडू लागतात, तर कधी ढुश्या देणारं वासरूही लाडिवाळ होतं. श्वासाचं हे 'नृत्य' आपण कधी पहात नाही. जाणत नाही. गौतमबुद्धांनी ते जाणलं आणि बोधिवृश्राखालचं 'श्वासलय' जगभर स्पंदित झालं.

म्हणून कवी म्हणतात,

''श्वासनृत्ये लोपलेला विश्वव्यापी स्पंद होता ।।''

'श्वासनृत्ये' नीट लक्षात घेतली तर जाणवतात. 'ध्याना'तही येतात. त्यांचं येणं–जाणं, जाणं–येणं यातून एक 'योग' जाणवत राहतो. योगाचं शास्त्रशुद्ध जाणणं आणि ते आत्मसात करणं, याचचं एक शास्त्र बनतं. त्याचाही मग अभ्यास होतो. श्वासाच्या नृत्यावर केंद्रित झालेलं मन, विश्वमनाशी तादाम्य पावतं, असं पुन्हा ते शास्त्रच सांगतं. श्वासाला लय, ताल, नाद असतो तो जाणवला तर त्याचं 'नृत्य' नित्य नूतन होऊन जातं, पण आम्ही सकाळी उठतो तेच श्वास विसरून आणि श्वास रोखून. रोखून तो विखरतो आपल्याच मनातल्या विचारांचा स्पंदांवरती. धपापतो कामांनी नि मोह मत्सरादी षड्रुपूंनी. श्वासांच्या लयीचं दमन करतो आणि त्यांना राबराब राबवतो. मोहमायेच्या विकारांसाठी. दमून श्वास टाकतो बिछान्यात दुसऱ्या दिवसासाठी. पण इथे तर कवी म्हणतात, 'श्वासनृत्ये लोपलेली' आहेत. हे 'लोपणं' काय असतं? लोपणं म्हणजे थांबणं! संपणं! तुटणं! नाही. लोप पावणं, म्हणजे कशात तरी मिसळून जाणं. अशा एका मोठ्या शक्तीत एकरूप होणं. कवी म्हणतात त्या प्रमाणे, ज्या चंदनी पौर्णिमेला अमृताचा स्वाद येतो, त्या पूर्णत्वाच्या शुभ्र दुपेडी शीतल प्रकाशात श्वासाची नृत्ये, विश्वव्याप्ती स्पंदात लोप पावतात. विश्वव्यापी स्पंदाबरोबर एकरुप होतात. पण हे केव्हा घडतं? कसं घडतं? तर प्रथम कृपा व्हायला हवी. ती गारव्याप्रमाणे अलवार हवी. त्याचं भान यायला हव. ते भान हळव्या चंद्राप्रमाणे यायला हवं. मग त्याच्या सोबत कस्तुरीच्या पावलांनी चांदणं हृदयात उगवायला हवं. त्या चंद्र चांदण्याची चंदनी पौर्णिमा व्हायला हवी, तिला अमृताचा स्वाद हवा. तरच श्वासनृत्ये विश्वव्यापी स्पंदात लोप पावणार. म्हणजे 'कृपा' हेच महत्त्वाचं इंगित. मग कृपा म्हणजे काय? कोण करतं? कोणाला मिळते?

बोटात उतरणारी चित्रकलेची जादू ही सुद्धा कृपाच आणि शब्दांना कवित्वाचा गूढ स्पर्श होतो ही सुद्धा कृपाच. सकाळी आपलं आपलं स्मरण घेऊन जागं होतो ही सुद्धा कृपा आणि शब्द, त्यांचा अर्थ, चेहरा आणि त्याचे भाव एकमेकांना कळतात, संवाद साधला जातो ही सुद्धा कृपाच. कृपेचा अथांग सागर पसरलाय अवतीभोवती. कवी म्हणतात 'तव कृपेच्या...' हे 'तव' कोण? हा शोध ज्याचा त्यानेच नको का घ्यायला? शोधा म्हणजे सापडेल. कारण कृपा इतकी थोर असतेच असते. त्यात सर्वच काही सापडतं.

**डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा, हायवे,
ठाणे – ४०० ६०१ दूरध्वनी : २५४७६१४५

●●●

# श्रीमत् आद्य शंकराचार्यकृत विवेकचूडामणि

*आद्य शंकराचार्यांच्या विवेकचूडामणि या ग्रंथातील महत्त्वाच्या विचारांची ही ओळख श्री. शंकरराव मठांनी दिशा वाचकांना करून दिली आहे - संपादक*

**ग्रंथविषयक संक्षिप्त माहितीः**

हा ग्रंथ श्रीमत् आद्य शंकवाचार्य यांनी रचिला असून यात एकूण ५८१ श्लोक आहेत. साधकांना आवश्यक साऱ्या गोष्टी या ग्रंथात आलेल्या आहेत. या ग्रंथात विस्तृतपणे खाली नमूद केलेल्या विषयांवर विचार केलला आहे. १) गुरुवंदना २) नरजन्म प्रशंसा ३) आत्मज्ञान हेच मुक्तीचे कारण ४) मुक्तीसाठीचा खरा प्रयत्न ५) ब्रह्मतत्त्वांचा विचार आवश्यक ६) आत्मज्ञानाचा अधिकारी ७) साधन चतुष्टय संपदा ८) गुरु शरणता ९) मोक्ष मार्गाचा उपदेश १०) मोक्षाची साधने ११) आत्मानात्म विवेचन १२) स्थूल शरीर वर्णन १३) सूक्ष्मशरीर वर्णन १४) कारण शरीर वर्णन १५) परमात्म स्वरूप वर्णन १६) बंधाचे स्वरूप १७) बंधातून सुटण्याचा मार्ग १८) अन्नमय कोश विवेक १९) प्राणमय कोश विवेक २०) मनोमय कोश विवेक २१) विज्ञानमय कोश विवेक २२) अनादि अविद्यानाश स्पष्टीकरण २३) आनंदमय कोश विवेक २४) परमात्म्याचे साक्षी स्वरूप २५) ब्रह्मतत्त्वाचे अद्वियत्व २६) ब्रह्माचे स्वरूप २७) तत्त्वमसि महा वाक्याचा अर्थ २८) वासना नाशाचा उपाय २९) प्रमादांचा त्याग ३०) समाधी कल्पना ३१) जीवन्मुक्तीची लक्षणे ३२) ज्ञानामुळे कर्माचा लय ३३) ब्रह्मत्वाठायी नानात्वाचा निषेध ३४) आत्मस्वरूप ज्ञान आवश्यक ३५) शिष्याचे स्वानुभव कथन ३६) गुरुचा पुनःउपदेश ३७) ब्रह्मज्ञान्याचे आचरण ३८) देहपात ३९) ब्रह्मभाव प्राप्ती

या ५८१ श्लोकांत वर उल्लेखिलेले विषय स्थूल-मानाने आले आहेत. या प्रत्येक विषयावरील अत्यंत अर्थपूर्ण श्लोक टिपलेला आहे. साधकाच्या संपूर्ण आचरणाचे विविरण यात आचार्यांनी केलेले आहे. आणि निर्दिष्ट केलेल्या विषयाची आवश्यकता प्रतिपादलेली आहे. ही कल्पना दृढ होताच साधकाच्या ठिकाणी आवश्यक गुणांचा विचार केलेला आहे. स्थूल सूक्ष्म कारण शरीराची माहिती दिलेली आहे. परमात्म स्वरूप बंध कोणता, त्यातून मुक्त होण्याचा उपाय, पंचकोशाची माहिती, परमात्मा साक्षी स्वरूप, ब्रह्म स्वरूपाचे आद्वितीयत्व आदि साधकाला सांगण्यात आलेले आहे. अरे तू तोच आहेस, तुझ्यात वासना आहेत त्यांचा नाश करण्याचा हा उपाय आहे. समाधी व जीवनमुक्त लक्षणे. आत्मस्वरूपाच्या ज्ञानानेच ब्रह्मज्ञान होते आणि हातून तसे आचरण घडते. देहापातानंतर पुनरावर्तन राहात नाही.

हे सारे विषय गंभीर असून गुरुशिष्य संवादात्मक मनोरंजन पद्धतीने आचार्यांनी मांडलेले आहेत. साधकाला या साऱ्या गोष्टी विषयी सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. सर्व सामान्यांनाही यांच्या पासून खूप बोध घेता येईल. मुद्दाम एकदा तरी हा ग्रंथ वाचावा आणि त्यातील आशय ध्यानी घ्यावा.

### १) गुरुवंदना

सर्व वेदान्त सिद्धान्त गोचरं तं अगोचरम्।
गोविन्दं परमानन्दं सद्गुरुं प्रणतोऽस्म्यहम्।।१।।

संपूर्ण वेदान्ताचा वर्ण्य विषय असणाऱ्या, इंद्रियांच्या कक्षेत न येणाऱ्या, परमानंद स्वरूप सद्गुरु गोविंदाला (गोविंद यतींना) मी वंदन करतो.

**२) नरजन्म प्रशंसा**

जन्तूनां नरजन्म दुर्लभम् - प्राणिमात्रांना मनुष्यजन्म मिळणे अवघड.

दुर्लभ त्रयं एव एतत् देवानुग्रह हेतुकम्। मनुष्यत्वं मुमुक्षत्वं महापुरुष संश्रयः ।।२ ।।

ईश्वर कृपा हेच ज्याचे कारण आहे अशा तीनही धारणा - मनुष्यत्व, मोक्ष प्राप्तीची इच्छा आणि साक्षात्कारी महात्म्यांचा सहवास-दुर्लभ आहेत.

**३) आत्मज्ञान हेच मुक्तीचे कारण**

पठन्तु शास्त्राणि यजन्तु देवान् कुर्वन्तु कर्माणि भजन्तु देवताः ।

आत्मैक बोधेन विना विमुक्तिः न सिध्यति ब्रह्मशतांन्तरे ।।६ ।।

कुणीही शास्त्र सांगो, देवता उद्दिष्ट यज्ञ करो, शुभकर्म करो, देवतांची पूजा करो, आत्मा व ब्रह्म यांच्या ऐक्याचे ज्ञान झाल्या शिवाय शेकडो ब्रह्मदेव होऊन गेले तरी मोक्ष मिळत नाही.

**४) मुक्तीसाठी खास प्रयत्न**

उधदरेत् आत्मानात्मानं मग्नं संसारवारिधौ ।
योगारुढत्व मासाद्य सम्यक् दर्शन निष्ठया ।।९ ।।

योगारुढ अवस्था प्राप्त करून यथार्थ ज्ञानाचा निश्चय झाल्यावर संसार सागरात बुडणाऱ्या स्वतःला स्वतःच वर काढावयास हवे.

**५) ब्रह्मतत्त्वाचा विचार आवश्यक**

चिन्मय येध्दये कर्म न तु वस्तूपलब्धशु।

वस्तु सिद्धिः विचारेण न किंचित् कर्मकोटिभिः ।।११ ।।

कर्म, चित्त शुद्धीला कारणीभूत होते. सत् तत्त्वाच्या साक्षात्कारासाठी नाही. सत् तत्त्वाची प्राप्ती विचाराने होते. कोट्यवधी कर्मे करूनही ती अजिबात होत नाही.

**६) आत्मज्ञानाचा अधिकारी**

मेघावी पुरुषो विद्वान उहापोह विचक्षणः ।

अधिकारी आत्मविद्यायां उक्त लक्षण लक्षितः ।।१६ ।।

बुद्धिमान, विद्वान् तर्क व वितर्क करण्यात कुशल, शास्त्रात सांगितल्या गेलेल्या लक्षणांनी युक्त असणारा पुरुष आत्मज्ञानाचा अधिकारी असतो.

**७) साधन चतुष्ट्य**

आदौ नित्यानित्य विवेकः परिगण्यते। इहा मुत्र फलभोग विरागः तदनंतरम् ।।१९ ।।

शमादि षट्क् संपतिः मुमुक्षत्वं इति स्फुटम्। ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या इस्थेवं रूपो विनिश्चयः ।।२० ।।

प्रथम नित्यानित्य विवेक विचारात घेतला जातो, त्या नंतर इह परलोकातील, भोग्य विषयीचे वैराग्य शमदमादि षट् संपत्ति व मुमुक्षा ही साधने या स्पष्ट आहेत.

काही शब्दांचे स्पष्टीकरण -

**तितिक्षा**-सहनं सर्व दुःखानां अप्रतिकार पूर्वकम्। चिन्ता विलाप रहितं सा तितीक्षा निगद्यते ।।२५ ।। सर्वदुःख प्रतीकार न करता काळजी व विलाप न करता सहन करणे, याला तितीक्षा असे म्हणतात.

**श्रध्दा** - शास्त्रस्य गुरुवाक्यस्य सत्यबुद्ध्याव धारणा। साश्रद्धा कथिता सब्दिःयया वस्तूपलभ्यते ।।२६ ।। शास्त्र व गुरू यांचा उपदेश खरा आहे. असा जो निश्चय, ज्या योगे ब्रह्म प्राप्ती होते त्यालाच सज्जन लोक श्रद्धा असे म्हणतात.

**समाधान** - सम्यक् आस्थापनं बुद्धेः शुद्धे ब्रह्मणि

सर्वदा। तत् समाधानं इत्युक्तं न तु चित्तस्यलालनम् ।।२७।। बुद्धीची शुद्ध ब्रह्मतत्वा ठायी सदैव स्थापना करणे यालाच समाधान म्हणतात. मनाचे चोचले पुरविणे नव्हे.

**मुमुक्षता –** अहंकारादि देहान्तान् बन्धात् अज्ञान कल्पितान्। स्व स्वरूपावबोधेन मोक्तुं इच्छा मुमुक्षता ।।२८।। अज्ञानाने कल्पिलेल्या अहंकारादिपासून देहापर्यंतच्या बंधातून स्वस्वरूपज्ञानाने सुटण्याची इच्छा हीच मुमुक्षा होय.

**भक्ती ही सर्व श्रेष्ठ होय –** मोक्ष कारण सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी । स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्य भिधीयते ।।३२।। मोक्षाला कारणीभूत होणाऱ्या सामग्रीसाठी भक्तीच श्रेष्ठ आहे. स्वस्वरूपानुसंधानालाच भक्ती असे म्हणतात –

**८) गुरु शरणता –**

स्वामिन् नमस्ते नतलोक बन्धो । कारुण्य सिंधो पतितं भवाब्धौ।

मामुध्दरात्मीय कटाक्ष दृष्ट्या। ऋज्व्याति कारुण्य सुब्धाभिवृष्ट्या।।३७।।

हे करुणा सागर स्वामी, आपल्याला नमस्कार असो. शरण आलेल्याला आप्त होणारे तुम्ही आहात. करुणामृताच्या वर्षाव करणाऱ्या निर्व्याज अशा आपल्या आपुलकीच्या दृष्टीने भव सागरात पडलेल्या माझा उद्धार करा.

शान्ता महान्तो निवसन्ति सन्तः वसन्तवल्लोक हितं चरंतः।

तीर्णास्वयं भीमभवार्णवं जनान् अहेतुनान्यान् अपि तारयन्तः ।।३९।।

वसंत ऋतूप्रमाणे विश्वाचे हित करणारे, स्वतः भयंकर भवसागरातून तरून गेलेले आणि अन्य लोकांनाही कोणताही हेतू नसताना तारणारे शांत चित्त मोठ्या मनाचे सज्जन या पृथ्वीतलावर आहेत.

**९) मोक्ष मार्गाचा उपदेश**

वेदान्तार्थ विचारेण जायते ज्ञानमुत्तमम।
तेनात्यन्तिक संसार दुःख नाशो भवत्यलम्।।४७।।

उपनिषदाच्या अर्थाचे मनन केल्याने उत्तम ज्ञान होते. आणि त्यामुळे संसार दुःखाचा समूळ नाश होतो.

श्रध्दा भक्ति ध्यान योगात् मुमुक्षोः मुक्तेर्हेतून् वक्ति साक्षात् श्रुतेर्गी :।

यो वा एतेषु एव तिष्ठत्यमुष्य । मोक्षो विद्या कल्पितात् देहबंधात्।।४८।।

श्रद्धा भक्ती ध्यान आणि योग अशी मुमुक्षूच्या मुक्तीची साधने साक्षात् श्रुतीनेच सांगितली आहेत. जो यांचाच आश्रय घेतो तो अविद्येने निर्माण केलेल्या देहबंधातून मुक्ती मिळवतोच.

को नाम बंधः कथमेष आगतः कथं प्रतिष्ठास्य कथं विमोक्षः।

कोऽसावनात्मा परमः क आत्मा। तयो र्विवेकः कथमेतत् उच्चताम्।।५१।।

बंध म्हणजे काय? हा कुठून आला? हा टिकतो कसा? यातून मुक्ती कशी मिळते? हा अनात्मा कोण? श्रेष्ठ आत्मा कोण? त्या दोहोंत भेद कोणता हे मला सांगावे.

**काही सुभाषित वजा श्लोक**

ऋण मोचन कर्तारः पितुःसन्ति सुतादयाः। बन्ध मोचन कर्ता तु स्वस्मात् अन्यो–न कश्चन।।५३।।

मस्तकन्यस्त भारादेः दुःखं अन्यैः निवार्यते। क्षुधादिकृतः दुःखं तु विनास्वेनेन न केनचित्।।५४।।

पथ्यमौषध सेवा च क्रियते येन रोगिणा। आरोग्य सिद्धिः दृष्टास्य नान्यानुष्ठित कर्मणा ।।५५।।

वस्तु स्वरूपं स्फुटबोधचक्षुषा स्वेनैव वेद्यं न तु पण्डितेन।

चन्द्र स्वरूपं निजचक्षुषैव ज्ञातव्यमन्यैः अवगम्यते किम् ।।५६ ।।

ब्रह्म स्वरूप स्वतःच निर्मळ ज्ञान दृष्टीने जाणावयाचे असते. पंडिताच्या साहाय्याने जाणावयाचे नसते. चंद्राचे स्वरूप (सौंदर्य) आपल्याच डोळ्यांनी जाणावयाचे असते तेथे दुसऱ्याच्या दृष्टीचा काय उपयोग?

शब्द जालं महारण्यं चित्त भ्रमणकारणम् । अतः प्रयत्नात् त्मव्यं तत्त्व ज्ञानं तत्त्व माज्ञानः ।।६२ ।।

शब्द जाल हे मनाला गोंधळात पाडणारे मोठे अरण्य आहे. म्हणून तत्त्वज्ञ गुरुकडून आत्मतत्त्व प्रयत्नपूर्वक जाणून घ्यावे.

न गच्छति विनापानं व्याधिः औषध शब्दतः । विनापरोक्षानुभवं ब्रह्म शब्दैः न मुच्यते ।।६४ ।।

नुसत्या औषधाच्या नावाच्या उच्चारणाने रोग बरा होत नाही. नुसते ब्रह्म उच्चारणाने मुक्ती मिळत नाही. औषध सेवन करावे लागते, तसेच ब्रह्मानुभव घ्यावा लागतो.

तस्मात् सर्व प्रयत्नेन भवबन्ध विमुक्तये । स्वै रेव यत्नः कर्तव्यः रोगादिरिव पंडितैः ।।६८ ।।

म्हणून रोगाबाबत ज्या प्रमाणे औषध सेवन, त्याच प्रमाणे बंधन मुक्ती साठी सर्व प्रकारे प्रयत्न विद्वानाने स्वतःच करावयाला हवेत.

**१०) मोक्षाची साधने –**

मोक्षस्य हेतुः प्रथमः निगद्यते । वैराग्यमत्यन्त अनित्य वस्तुषु ।

ततः शमश्चापि दमस्तितीक्षा । न्यासः प्रसक्ताखिल कर्मणांभृशम् ।।७१ ।।

अनित्य वस्तुविषयी आत्यंतिक वैराग्य हे मोक्षाचे पहिले कारण. नंतर शम दम तितीक्षा आणि आसक्तीयुक्त सर्व कर्माचा आत्यंतिक त्याग ही कारणे आहेत.

ततः श्रुतिः ततः मननं सतत्वध्यानं चिरं नित्य निरंतरं मुनेः ।

ततोऽ विकल्पं परमेत्य विद्वान इहैव निर्माण सुखं समृच्छति ।।७२ ।।

नंतर श्रवण–त्यावर मनन आणि त्या चिरंतन सत्‌तत्वाचे निरंतत ध्यान, नंतर त्या निर्विकल्प श्रेष्ठतत्वाप्रत जाऊन विद्वान मुक्तीचे इथे सुख मिळवतो.

**११) आत्मानात्म विवेचन –**

यत् बोध्दव्यं तवे दानीं आत्मानात्म विवेचनम् ।

तदुच्यते मया स्मयक् श्रुत्वा आत्मनि अवधारय ।।७३ ।।

तू जाणतोस असे जे आत्मानात्म विवेचन आहे ते मी आता सांगतो ते लक्ष पूर्वक ऐकून मनात साठव.

**१२) स्थूल शरीर वर्णन –**

अहं ममेतिप्रथितं शरीरम् । मोहास्पदं स्थूलमिति ईयते बुधैः ।।७५ ।।

मी, माझे असा मोह उत्पन्न करणाऱ्या शरीराला स्थूल शरीर असे विद्वान म्हणतात.

स्थूलस्य संभव जरा मरणानि धर्माः । स्थौल्यादयो बहुविधाः शिशुताद्यवस्थाम् ।

वर्णाश्रमादि नियमाः बहुशा मयास्युः । पूंजावमान बहुमान मुखाः विशेषाः ।।९३ ।।

स्थूल देहाला जन्म वार्धक्य आणि मरण हे धर्म आहेत. इतर धर्म बाल्य इत्यादी बहुविध अवस्था वर्ण आणि आश्रमांचे नियम अनेक प्रकारचे रोग मान सन्मान अवमान मान्यता इत्यादी वैशिष्ट्ये आहेत.

**१३) सूक्ष्म शरीरवर्णन –**

वागादिपञ्च श्रवणादि पञ्च प्राणादिपञ्च अभ्रमुखानिपञ्च।
बुद्ध्यादि अविद्यापि न काम कर्मणि पर्युष्टकं सूक्ष्मशरीरमाहुः ।।९८।।

वाक् आदि पाच कर्मेंद्रिये, श्रोत्रादि पांच ज्ञानेंद्रिये, प्राणादि पांच प्राण,आणि आकाश मुख्य प्रभृति पंच महाभूते, बुद्धि सह चतुर्विध अंतःकरण अविद्या काम व कर्म मिळून सूक्ष्म शरीर होते.

विषयाणां अनुकूल्येन सुखी दुःखी विपर्यये। सुखं दुःखं च तत् धर्म सदानंदस्य न आत्मनः ।।१०७।।

विषयाच्या अनुकूलतेनुरूप तो सुखी होतो, त्याच्या उलट झाले तर जो दुःखी होतो. सुख आणि दुःख हे त्यांचे धर्म आहेत, नित्पआनंदरूप आत्म्याचे नव्हेत.

**१४) कारण शरीरवर्णन**

अव्यक्तनाम्नी परमेश शक्तिः अनाद्य विद्या त्रिगुणात्मिका पदा।
कार्यानुमेया सुधियैव माया ययाजगत् सर्वमिदं प्रसूयते।।१००।।

अव्यक्त नावाची परमेश्वराची शक्ती आहे. अनादि त्रिगुणांनी युक्त अशी ही श्रेष्ठ अविद्या मायाशक्ती जिच्यामुळे हे विश्व निर्माण होते तिचे अनुमान बुद्धिमान लोक तिच्या कार्यावरून करतात.

अव्यक्तं एतत् त्रिगुणैः निरुक्तं तत्कारणं नाम शरीरमात्मनः।
सुषुप्तिरेतस्य विभक्त्यवस्था प्रलीन सर्वेन्द्रिय बुद्धिवृत्तिः ।।१२२।।

त्रिगुणांनी युक्त असे वर्णिलेले हेच आत्म्याचे कारण शरीर होय. सुषुप्ती ही याची वेगळी अवस्था आहे. ज्या अवस्थेत इंद्रियाच्या व बुद्धीच्या सर्ववृत्ती लीन होतात.

**१५) परमात्म स्वरूप वर्णन –**

अस्तिकश्चित् स्वयं नित्यं अहंप्रत्ययलंबनः।
अवस्थात्रय साक्षी सत् पंचकोश विलक्षणः ।।१२७।।

मी या प्रत्ययाचा आधार असा कुणी स्वतः नित्य पदार्थ आहे. तीन अवस्थांचा साक्षी असणारा तो पाच कोशाहून वेगळा आहे. (अवस्था जाग्रत, स्वप्न, सुषुप्ति, कोश–अन्न, प्राण, मन, विज्ञान, आनंद).

येन विश्वं इदं व्याप्तं यं न व्याप्नोति किंचन।
आभारूपं इदं सर्वं यं भान्तं अनुभात्ययम् ।।१३०।।

ज्याने हे सर्व विश्व व्यापले आहे, पण ज्याला कोणी व्यापू शकत नाही असा हा आत्मा आहे. हे जे सारे प्रकाशरूप दिसते ते त्याच्या प्रकाशामुळे दिसते. तोच हा परमात्मा होय.

**१६) बंधाचे स्वरूप–**

अत्र अनात्मनि अहं इति बंधः एष अस्य पुंसः ।।१३९।।

इथे अनात्म्याच्या ठायी मी ही भावना निमार्ण होणे हा जीवाना अज्ञानामुळे प्राप्त झालेला बंध आहे.

अतस्मिन् तत् बुद्धिः प्रभवति विमूढस्य तमसा ।।१४०।।
मूर्खाला अज्ञानामुळे जिथे जे नाही ते भासते.
एताभ्यांभं एव शक्ताभ्यांबंधः पुंसः समागतः।
याभ्यां विमोहितो देहं मत्वात्मानं भ्रमत्ययम्।।१४६।।

या दोन शक्तीमुळेच जीवाला बंध प्राप्त होतो. त्यांच्यामुळेच संभ्रमात पडून देहाला आत्मा मानून तो संसार चक्रात फिरत राहातो. (या दोन शक्ती–आवरण न विक्षेप)

### १७) बंधातून सुटण्याचा उपाय –

न अस्त्रैः न शस्त्रैः अनिलेन वन्हिना । छेत्तुं न शक्यो न च कर्म कोटिभिः ।
विवेक विज्ञान महा सिना विना । धातु प्रसादेन शितेन मञ्जुना ।।१४५ ।।

अस्त्रांनी, शस्त्रांनी, वाऱ्याने, वा अग्नीने वा कोटी कोटी कर्माने याला छेदणे शक्य नाही. तो ईश कृपेने मिळणाऱ्या तीक्ष्ण व मनोहर अशा विवेक ज्ञानरूपी उत्तम खड्गा शिवाय छेदला जाणार नाही.

आत्मानात्म विवेकः कर्तव्यो बंध मुक्तये विदुषा।
तेनौवानन्दी भवति स्व विज्ञाय सच्चिदानन्दम् ।।१५४ ।।

बंधातून मुक्त होण्यासाठी शहाण्याने आत्मानात्म विवेक करावा. त्यामुळेच तो स्वतःच्या सच्चिदानंद रूपाला जाणून आनंदी होतो.

### १८) अन्नमय कोश–

देहोऽयं अन्नभवनोऽन्नमयस्तु कोशो हि अन्नेन जीवति विनश्यति तत् विहीनः ।
त्वक् चर्म मांस रुधिरास्थि पुरीष राशिर्नीयं स्वयं भवितुं अर्हति नित्युशद्धः ।।१५६ ।।

अन्नापासून बनलेला हा देहच अन्नमय कोश आहे. हा अन्नामुळे जगतो व त्या विना नाश पावतो. त्वचा,कातडी, मांस, रक्त, आस्थि, मल यांचा समूह युक्त हा कोश नित्य निर्मल आत्मा होण्यास समर्थ नाही.

### १९) प्राणमय कोश–

कर्मोन्द्रियैः पंचभिरञ्चितोऽयं । प्राणो भवेत् प्राणमय स्तु कोशः ।
येनात्मवात् अन्नमयोऽनु पूर्णः । प्रवर्ततेऽसौ सकल क्रियासु ।।१६७ ।।

पंच कर्मेन्द्रियानी युक्त असा हा प्राणच प्राणमय कोश आहे.

### २०) मनोमय कोश–

ज्ञानेन्द्रियाणि च मनश्च मनोमयः स्यात् कोशो ममाह मिति वस्तु विकल्प हेतुः ।
संज्ञादि भेद कलना कलितो बलीयान स्तत् पूर्वकोशं अनुपूर्य विजृंभते यः ।।१६९ ।।

ज्ञानेन्द्रिये आणि मन हा मी व माझे इत्यादी विकल्पांना कारणीभूत ठरणारा मनोमय कोश होय. नामादी भेदांच्या जाणिवेने जो जाणता येतो तो पूर्वीच्या कोशांना व्यापून राहाणारा बलशाली कोश आहे.

मनः प्रसूते विषयान् अशेषान् स्थूलात्मना सूक्ष्मतया च भोक्तुः ।
शरीर वर्णाश्रम जाति भेदान् गुणक्रियाहेतु फलानि नित्यम् ।।१७९ ।।

मनच सर्व स्थूल सूक्ष्म विषयाना, शरीर वर्ण आश्रम जाती इत्यादी भेदांना आणि गुण क्रिया हेतू आदी फलादीना भोक्त्यासाठी निर्माण करते.

तन्मनः शोधनं कार्यं प्रयत्नेन मुमुक्षुणा। विशुद्धे सतिचेत् अस्मिन् मुक्ति करफलायते ।।१८३ ।।

त्या मनाची शुद्धी मुमुक्षूने प्रयत्न पूर्वक करायला हवी. ते विशुद्ध झाले की ही मुक्ती करतल आमलवत् होते. (हातातील आवळ्या इतकी स्पष्ट होते.)

### २१) विज्ञान मय कोश–

बुद्धिः बुद्धिंद्रियैः सार्धं सवृत्तिः कर्मलक्षणम् ।
विज्ञानमय कोशः स्यात् पुंसः संसार कारणम् ।।१८६ ।।

वृत्तीसह बुद्धी आणि ज्ञानंद्रिये यांनी युक्त मी कर्ता

असे म्हणतात. हा विज्ञानमय कोशच माणसाच्या संसाराचे कारण ठरेल.

**२२) अनादि अविद्यानाश स्पष्टीकरण -**

शिष्य म्हणतो-तत् उपाधेः अनादित्वात् न अनादेः नाशः इष्यते ।।१९४।।

उपाधि अनादि आहे आणि अनादी वस्तूचा नाश होत नाही.

गुरु-अनादित्वं अविद्यायाः कार्यस्यापि तवेष्यते।
उत्पन्नायां तु विद्यायां अविद्यकं अनाद्यपि ।।२००।।

अज्ञान व अज्ञानाचे कार्य यांचे अनादित्व मानले गेले आहे. पण ज्ञानाचा उदय होताच अनादि असूनही अज्ञान-जाग्रतीने स्वप्न समूळ नष्ट होते तद्वत् समूळ नष्ट होते हे अनादि असूनही प्राक्भावा प्रमाणे नित्य नाही.

**२३) आनंदमय कोश-**

आनंदमय कोशस्य सुषुप्तौ स्फूर्त्तिरुत्कटा।
स्वप्न जागरयोरीषद् इष्ट संदर्शिना विना ।।२१०।।

सुषुप्ती अवस्थेत आनंदमय कोशाचे स्फुरण उत्कटतेने होते. स्वप्नात व जाग्रतीत हे स्फुरण इष्ट वस्तूंच्या दशार्नादीनी किंचित् मात्रच होते.

**२४) परमात्म्याचे साक्षीस्वरूप -**

शिष्य - विज्ञेयं गुरो किमुवस्तु आस्ति स्वं आत्मना अत्र विपश्चिता ।।२१४।।

हे गुरुवरा विद्वानाने ज्याला आपले स्वरूप म्हणून जाणावे अशी कोणती बरे वस्तू आहे?

गुरु-असौ स्व साक्षिको भावो यतः स्वेन अनुभूयते ।
अतः परं स्वयं साक्षात् प्रत्यगात्मा न चेतरः ।।२१८।।

हा आपला आत्मा आपला आपल्यालाच अनुभवाला येतो, म्हणून तो स्वतःच साक्षी आहे, भावरूप आहे. हा प्रत्यगात्माच साक्षात् ब्रह्मरूप आहे. त्याहून श्रेष्ठ असा दुसरा कुणी त्याचा साक्षी नाही.

**२५) ब्रह्मतत्त्वाचे अद्वियत्व-**

ब्रह्मैवेदं विश्व मित्येव वाणी श्रौतीब्रूतेऽथर्व निष्ठावरिष्ठा।
तस्मात् सर्वं ब्रह्ममात्रं हि विश्वं नाधिष्ठानात् भिन्नतारोपितस्य ।।२३४।।

हे विश्व ब्रह्मच आहे अशी अथर्व वेदाची अलौकिक उक्ती आहे. म्हणून हे सर्व विश्व ब्रह्मरूपच आहे. कारण आरोपित वस्तू अधिष्ठात्यापेक्षा वेगळी असू शकत नाही.

**२६) ब्रह्माचे स्वरूप -**

ज्ञातृज्ञेयज्ञान शून्यं अनन्तं निर्विकल्प कम्।
केवला खण्डचिन्मात्रं परंतत्वं विदुर्बुधाः ।।२४१।।

ज्ञाता ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीने रहित अनंत निर्विकल्प केवळ आणि अखंड चैतन्यरूप म्हणून विद्वान त्याला जाणतात.

**२७) तत्त्वमसि महावाक्याचा अर्थ -**

तत्वं पदाभ्यां अभिधीय मानयोः ब्रह्मात्मनोः शोधितयोः यदित्थम्।
श्रुत्या तयोस्तत्वमसीति स्मयक् एकत्वमेव प्रतिपाद्यते मुहुः ।।२४३।।

तत् त्वं असि वाक्या मधील तत् त्वं पदाच्या शोधातून सांगितल्या गेलेल्या ब्रह्म आणि आत्मा या तत्वाचे पूर्ण ऐक्य पुनः पुनः श्रुतिद्वारे प्रतिपादन केले जाते.

या द्विभाति सत् अनेकधा भवन्नाम रूप गुण विक्रियात्मना।
हेयवत् स्वयं अविक्रयं सदा ब्रह्म तत्वमसि भावयमात्मनि ।।२६३।।

जे स्वतः सदैव सोन्याप्रमाणे अविकारी आहे. पण भ्रमामुळे नामरुप गुणादी विकारांच्या रूपात अनेक प्रकारचे भासते ते ब्रह्मतत्व तू आहेस, असा मनाशी निश्चय कर.

**२८) वासना नाशाचा उपाय–**

ज्ञाते वस्तुन्यपि बलवती वासनानादिरेषा।
कर्ताभोक्ताप्यहमिति दृढायास्य संसार हेतुः।
प्रत्यक् दृष्ट्यात्मनि निवसता सापनेया प्रयत्नान्।मुक्तिं प्राहुः तदिह मुनयोवासनानानवं यत्।।२८९।।

परमात्म तत्त्वाचे ज्ञान झाले तरी सुद्धा मी कर्ता आहे, भोक्ता आहे अशा स्वरूपाची आनादी दृढ अशी जी वासना ती याच्या संसरणाचे कारण आहे. प्रत्येक दृष्टीने आत्म्यात स्थिर राहणाऱ्याने ती प्रयत्नपूर्वक दूर केली पाहिजे. इथे वासनांची जी क्षीणता तिलाच मुनिजन मुक्ती असे म्हणतात.

वासना वृद्धितः कार्यं कार्य वृद्धयाच वासना। वर्धते सर्वथा पुंसः संसारेन निवर्तते।।३१४।।

वासना वाढल्याने कार्य वाढते व कार्य वाढल्याने वासना वाढते, पुरुषाचे संसरण अजिबात थांबत नाही.

क्रियानाशे भवेत् चिन्ता नाशोऽस्मात वासना क्षयः।
वासना प्रक्षयो मोक्ष स जीवम् मुक्तिरिष्यते।।३१८।।

क्रिया नाहीशा झाल्या की चिन्तानाश होतो आणि त्यामुळे वासना नाश होतो. वासना नाश हाच मोक्ष आहे त्यालाच जीवनमुक्ती म्हणतात.

**२९) प्रमादाचा त्याग–**

न प्रमादात् अनर्थोऽन्यो ज्ञानिनः स्वस्वरूपतः।
ततो मोहः ततोऽहंधीस्ततो बन्धस्ततो व्यथा।।३२३।।

स्वस्वरूपानुसंधानात प्रमाद करण्यासारखा ज्ञानी माणसाच्या बाबतीत दुसरा अनर्थ नाही. त्यातून अज्ञान, त्यातून अहंभाव, त्यातून बंध व त्यातून दुःख निर्माण होते.

**३०) समाधी कल्पना –**

आवरणस्य निवृत्तिः भवतिच सम्यक पदार्थ दर्शनात्।
मिथ्याज्ञान विनाशः तत् विक्षेप जनित दुःख निवृत्तिः।।३४८।।

सत्य पदार्थाच्या ज्ञानाने आवरणाचा नाश होतो, त्या प्रमाणे मिथ्याज्ञानाचा विनाश होतो, व विक्षेपाने निर्माण होणाऱ्या दुःखाची निवृत्ती होते.

अतीव सूक्ष्मं परमात्म तत्वं न स्थूल दृष्ट्या प्रतिपत्तु मर्हति।
समाधिमात्यन्तं सुसूक्ष्म वृत्त्या ज्ञानव्यमार्यैः अतिशुद्धबुद्धिभिः।।३६१।।

अत्यंत सूक्ष्म असे परमात्म तत्व जाणणे स्थूल दृष्टीने शक्य नाही. अतिशय सूक्ष्म वृत्तीने एकाग्र मनाने, अत्यंत शुद्धबुध्दीने आर्यांने ते जाणून घेतले पाहिजे.

योगस्य प्रथमं द्वारं वाङ् निरोधोऽपरिग्रहः। निराशाच निरीहाच नित्यं एकान्त शीलता।।३६८।।

वाणीचा निग्रह, संचय न करण्याची वृत्ती, अलिप्तता निरिच्छा आणि एकान्तात राहण्याचा स्वभाव ही योगाची प्रथम द्वारे आहेत.

ब्रह्मादि स्तंबपर्यन्ता तृषामात्रा उपाधयः। ततःपूर्णं स्वमात्मानं पश्यते एकात्मना स्थितम्।।३८७।।

ब्रह्मदेवा पासून स्तंबा पर्यंत साऱ्या उपाधी केवळ मिथ्या आहेत तेव्हा आपल्यातच परिपूर्ण आत्मस्वरूपाला अद्वैत भावाने पाहावे.

सर्वोपाधि विनिर्मुक्तं सच्चिदानंद मद्वयम्। भावयात्मानमात्मस्थं न भूय कल्पसेऽध्वने।।४१३।।

सर्व उपाधींतून पूर्ण मुक्त अद्वितीय सच्चिदानंद अशा आपल्या अन्तःकरणात स्थित असलेल्या आत्म्याचे चिंतन कर, म्हणजे पुनः हा मार्ग तुझ्यासाठी असणार नाही.

**३१) जीवन्मुक्ताची लक्षणे –**

प्रारब्ध सूत्र ग्रथितं शरीरं प्रयातु वा तिष्ठतु गोरिवस्त्रक् न तत् पुनः पश्यति तत्ववे त्तानन्दात्मत्पनि ब्रह्मणि लीन वृत्तिः ।।४१७।।

गायीच्या गळ्यातील माळेसारखी, तसे प्रारब्ध सूत्रात गुंफलेले शरीर, जावो वा राहो त्या विषयी सद्रूप ब्रह्माठायी ज्याचे मन एकाग्र झाले आहे असा तत्वज्ञ पुनः विचार करत नाही.

**३२) ज्ञानामुळे कर्माचा लय–**

प्रारब्धं बलवत्तरं खलु विदां भोगेन तस्य क्षयः। सम्यक्ज्ञान हुताशनेन विलयः प्राक्संचिता गामिनाम्।

ब्रह्मात्मैक्यमवेक्ष्य तत्मयतया ये सर्वदा संस्थिताः तेषां तत् त्रितयं न क्वचिदपि ब्रह्मैव ते निर्गुणं ।।४५४।।

विद्वांनाचे प्रारब्ध खरोखरच बलवत्तर असते. त्याचा नाश भोगानेच होतो. पूर्वीच्या संचिताच्या व पुढे येणाऱ्या कर्माचा नाश यथार्थत ज्ञानरूप अग्नीनेच होतो. ब्रह्मत्मैक्य जाणून तद्रुप भावाने जे सदैव राहतात त्यांनाही तीन कर्मे कधीच नसतात. ते निगुर्ण ब्रह्मरूपच असतात.

**३३) ब्रह्मत्वाठायी नानात्वाचा निषेध –**

निर्गुणं निष्फलं सूक्ष्मे निर्विकल्पं निरंजनं। एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन।।४६९।।

(परिपूर्ण अनादि, अनंत, अप्रमेय अविकारी) निर्गुण निरवयव सूक्ष्म निर्विकल्प निरंजन, एकमेवाद्वितीय असे हे ब्रह्म आहे इथे काहीच विविधता नाही.

**३४) आत्मस्वरूप ज्ञान आवश्यक–**

निरस्त रागा निरपास्त भोगाः शान्ता सुदान्ता यतयो महान्तः।

विज्ञाय तत्त्वं परमे तदन्ते प्राप्ताः परां निवृत्तिमात्मयोगात्।।४७२।।

ज्यांची आसक्ती संपली आहे, जे भोगापासून अलिप्त आहेत, जे शान्त दान्त महान् संन्यासी ते श्रेष्ठतर जाणले असता आत्म स्वरूपाच्या ज्ञानाने श्रेष्ठ आनंदाप्रत गेले आहेत. (दान्त–इंद्रियसंयमी)

**३५) शिष्याचे स्वानुभव कथन –**

क्वगतं केन वा नीतं कुत्रलीनं इयं जगत्। अधुनैव मयादृष्टं नास्ति किं महदद्भुतं ।।४८४।।

हे विश्व कोठे गेले किंवा कुणी कोठे नेल आत्ताच तर मी पाहिले होते आता का बरे नाही. हे अद्भुतच आहे.

धन्योऽहं कृतकृत्योऽहं विमुक्तोऽहं भवग्रहात्। नित्यानंद रुपोऽहं पूर्णोऽहं त्वदनुग्रहात्।।४८९।।

तुमच्या कृपेमुळे मी धन्य आहे, कृतार्थ आहे, भवबंधनातून मुक्त आहे. नित्यानंदरूप आहे. पूर्ण आहे.

नाहं इदं नाहं अदः अपिउभयोः अवभासकं परं शुद्धम्। बाह्याभ्यंतर शून्यं पूर्णब्रह्म अद्वितीयं एव अहम्।।४९३।।

हे मी नाही आणि ते मी नाही. दोघांना प्रकाशित करणारे अतिशय शुद्ध असे अंतर्बाह्य भेदांनी रहित पूर्ण अद्वितीय असे ब्रह्म मी आहे.

कर्तापि वा कारयितापि नाहं भोक्तपि वा भोजयितापिनाहं।
द्रष्टापिता दर्शयितापि नाहं सोऽहं स्वर्गज्योतिरनीहगात्मा।।५०८।।

मी कर्ता नाही करविता नाही, मो भोक्ता नाही, भोगविणारा नाही, मी द्रष्टा नाही आणि दाखविणारा नाही. मी तो स्वयंप्रकाश अदृश्य आत्मा आहे.

**३६) गुरूचा उपदेश–**

स्वमेव सर्वतः पश्यन् मन्यमाः स्वंअद्वयम्। स्वानंदंअभुञ्जानः कालं नय महामते।।५२५।।

हे महामते स्वतःलाच सर्वत्र पहाणारा स्वतःलाच आद्वितीय मानणारा तू स्वानंदाचा अनुभव घेत कालक्रमणा कर.

नास्ति निर्वाचनात् मौनात् परं सुखकृत् उत्तमम्। विज्ञानात्मा स्वरूपस्य स्वानंदं रस पायिनः।।५२८।।

जो आत्म स्वरूप जाणणारा आहे आणि स्वानंद रसाचे पान करणारा आहे त्याला निर्वासन मौनाहून दुसरी सुखदायक उत्तम गोष्ट नाही. (निर्वासन मौन–मनातून वासना पूर्णतः निघून गेल्यावर जे मौन साधते ते) (आकार मौन– सर्व क्रिया करताना बोलणे बंद . काष्ठमौन – मनात कुठलीही वृत्ती न जागू देणे).

**३७) ब्रह्मज्ञानीयाचे आचरण –**

न खिद्यते विषयैः प्रमोदतेन सज्जतेनापि विरज्यतेच।
स्वस्मिन् सदा क्रीडति नन्दति स्वयं निरन्तरानन्द रसेन तृप्तम्।।५३७।।

तो विषयांनी आनंदित होत नाही वा खिन्न होत नाही. निरंतर आनंद रसाने तृप्त झालेला तो आसक्त वा विरक्त होत नाही. तो सदैव आनंदात मग्न असतो.

निर्धनोऽपि सदातुष्टः अपि असहायो महाबलः। नित्यतृप्तोऽपि अभुञ्जानः अपि असमः समदर्शनः।।५४४।।

तो निर्धन असून सदैव संतुष्ट, असहाय असून महाबलशाली, उपभोग न घेताही नित्यतृप्त विचित्र वागणारा असूनही समदर्शी असतो.

**३८) देहपात–**

यत्र क्वापि विशीर्णपर्णमिव तरोःवपुः पतनात्। ब्रह्मीभूतस्य यतेः प्रागेव हि तत् चिदग्निना ।।५५८।।

ब्रह्मरूप झालेल्या यतीचा देह विशीर्ण होणाऱ्या वृक्षाच्या पर्णाप्रमाणे कुठेही पडला तरी बिघडत नाही. तो आधीच ज्ञानरूपी अग्नीने दग्ध झालेला असतो.

देहस्य मोक्षो न मोक्षो न दण्डस्य कमण्डलोः। अविद्या हृदयग्रंथिः मोक्षो मोक्षो यतस्ततः।।५५९।।

देहपात मोक्ष नव्हे, कमण्डलु वा दण्ड त्याग मोक्ष नव्हे.अविद्यारूप ग्रंथी पासून सुटका म्हणजे मोक्ष होय.

**३९) ब्रह्म प्राप्ती –**

विलक्षणं यथाध्वान्तं लीयते भानु तेजसी। तथैव सकलं दृश्यं ब्रह्मणि प्रविलीयते।।५६५।।

सूर्य प्रकाशात अंधार विलीन होतो. त्याप्रमाणे सारे दृश्य ब्रह्मात विलीन होते.

न निरोधो न चोत्पत्तिः न बंधो न च साधकः। न मुमुक्षः न वै मुक्तः इत्येषा परमार्थता।।५७५।।

इथे नाश नाही, उत्पत्ती नाही, बंध नाही वा मोक्ष नाही, मुमुक्षः नाही की मुक्त नाही हेच सत्य.

इतिश्रुत्वा गुरोः वाक्यं प्रश्नयेणकृतानतिः । स तेन समनुज्ञातः ययौ निर्मुक्त बंधनः।।५७७

गुरूचे हे वचन ऐकून विनम्र भावाने नत मस्तक होऊन त्यांची आज्ञा घेऊन बंध मुक्त शिष्य निघून गेला.

हितमिदं उपदेशं आद्रियन्तां विहित निरस्त समस्त चिन्तदोषाः।
भव सुख निरताः प्रशान्त चित्ताः श्रुति रसिका यतयो मुमुक्षवो ये ।।५८०।।

विहित पद्धतीने ज्याचे समस्त चित्तदोष नाहीसे झाले आहेत आणि जे श्रुतीचे जाणकार आहेत, जे संसार सुखा विषयी उदासीन झाले आहेत, जे प्रशांत चित्त आहेत, ते मुमुक्षु यती या हितकर उपदेशाचा आदर करोत.

संसाराध्वनि तापभानु किरणा प्रोभ्दूत दाह व्यथा।
खिन्नानां जलकांक्षया मरु भुवि भ्रान्त्या परिभ्राम्पताम्।
अत्यासन्न सुधाम्बुधिं सुखकरं ब्रह्माद्वयं दर्शयन्।
एषा शांकरभारती विजयते निर्वाण संदायिनी।।५८१।।

संसाररूपी मार्गावर दुःखरूपी सूर्याच्या किरणामुळे उद्भवलेल्या दाहव्यथेने खिन्न झालेल्या पाण्याच्या इच्छेने अज्ञानामुळे (भ्रमामुळे) वाळवंटात भटकणाऱ्याना अगदीच जवळ असणारा सुखदायक अद्वय ब्रह्मरूप अमृताचा सागर दाखविणारी मोक्ष दायिनी अशी श्री शंकराचार्यांची वाणी विजयी आहे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

| अ.क्र | संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | डॉ. बेडेकर विद्या मंदिर – मराठी माध्यम शाळा (पूर्वीची रजिस्टर्ड खाजगी मराठी शाळा – १९३४) | १९५८ |
| २ | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद – 'अ' तर्फे पुनर्मूल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ३ | के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद – 'अ' तर्फे पुनर्मूल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ४ | विप्रमंचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय (राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद – 'अ' तर्फे मूल्यांकित) | १९७२ |
| ५ | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था (पूर्वीची औद्योगिक व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था) ISO ९००१ : २००८ (SGS - UK), एआयसीटीई मान्यताप्राप्त | १९७३ |
| ६ | सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा | १९७६ |
| ७ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन (राष्ट्रीय मूल्यांकन-NBA तर्फे मूल्यांकित एआयसीटीई मान्यताप्राप्त) | १९८३ |
| ८ | विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र | १९९६ |
| ९ | विप्रमंचे तंत्रनिकेतन-माहिती व तंत्रज्ञान केंद्र | २००० |
| १० | विप्रमंचे परदेशी भाषा अभ्यास केंद्र | २००८ |
| ११ | विप्रमंचे संरक्षण व व्यूहरचना अभ्यास केंद्र | २००८ |
| १२ | विप्रमंची लंडन ॲकेडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, लंडन | २००९ |
| १३ | विप्रमंचे आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन केंद्र | २००९ |
| १४ | विप्रमंचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर, जिल्हा रत्नागिरी | नियोजित |

# सन्मित्रची ६० वर्षांची वाटचाल

*ठाण्यातील सर्वांत जुन्या 'सन्मित्र' या वृत्तपत्राचा महोत्सवी वाटचालीबद्दल गौरव झाला. त्यासंबंधातील गौरव ग्रंथात घेण्यात आलेला मूळ लेख व विद्यमान संपादिका सौ. तनुजा जोशी यांचे मनोगत - संपादक*

स्वातंत्र्योत्तर काळात आजपर्यंत प्रदीर्घ काळ टिकून राहिलेले एवढेच नव्हे तर ठाणे जिल्ह्याचे एक अग्रगण्य दैनिक म्हणून विकसित पावलेले वृत्तपत्र म्हणून 'सन्मित्र'चा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्योत्तर काळातील ठाणे जिल्ह्याच्या आजतागायत गेल्या ६० वर्षांच्या वाटचालीचा साक्षीदार म्हणून 'सन्मित्र' या वृत्तपत्राचा उल्लेख केला तर ते उचितच ठरेल.

सन्मित्रचा पहिला अंक २०-१०-१९४९ रोजी स.पां. जोशी यांच्या संपादनाखाली प्रसिद्ध झाला. तो दिवाळी अंक होता. मुखपृष्ठावर भाऊबीज या स.पां. जोशी यांच्या काव्यसंग्रहाचे बुहरंगी चित्र होते. 'भाऊबीज' या काव्यसंग्राहाचे प्रकाशन कवी प्रफुल्लदत्त यांचे हस्ते झाले होते. सन्मित्रच्या एका अंकाची त्यावेळची किंमत होती १ आणा तर वार्षिक वर्गणी होती अवघी अडीच रुपये.

साप्ताहिक वृत्तपत्र म्हणून प्रथम प्रसिद्ध होणारे 'सन्मित्र' १५ ऑगस्ट १९७५ रोजी काही दिवस दैनिक स्वरूपात प्रसिद्ध झाले. परंतु त्यावेळची ठाणे जिल्ह्यातील परिस्थिती लक्षा घेऊन स. पां. जोशी यांनी १९७५ ते १९८२ या काळात 'सन्मित्र' द्वि-साप्ताहिक स्वरूपात म्हणजे आठवड्यातून दोनदा प्रसिद्ध केले. 'ठाणे जिल्ह्यातील घडामोडींचे खरेखुरे प्रतिबिंब' असे या वृत्तपत्राला म्हणावे लागेल. १९८२ साली ठाणे महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी ठाणे शहर आणि जिल्ह्याचे वाढलेले स्वरूप लक्षात घेऊन ऑगस्ट १९८२ पासून 'सन्मित्र' दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले ते आजपर्यंत नित्यनेमाने दैनिक स्वरुपात प्रसिद्ध होत आहे.

अनेक विषयांवरील विशेषांक काढून 'सन्मित्र' ने ठाणे जिल्ह्याची सेवा केली. त्यात कलाकार अंक, ग्रंथालय अंक, सहकार अंक, ठाणे जिल्ह्यातील मान्यवरांचे स्मृति विशेषांक, मान्यवरांचे अमृतमहोत्सवानिमित्त काढलेले विशेषांक, महात्मा जोतीबा फुले यांच्यावर तर लागोपाठ ३-४ वर्ष काढलेले विशेषांक, दिवाळी अंक 'सन्मित्र' ने प्रसिद्ध केले. त्याबरोबरच सातत्य आणि नियमितपणा हे या वृत्तपत्राचे या जिल्ह्यातील वृत्तपत्र इतिहासातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणावे लागेल. स्वातंत्र्योत्तर काळातील ठाणे जिल्ह्याचा सर्वांगीण इतिहास लिहायचा झाला तर 'सन्मित्र' च्या जुन्या अंकाच्या फाईलींना डावलून पुढे जाताच येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. अनेकांनी आपल्या पुस्तकांसाठी, चरित्र लेखनासाठी 'सन्मित्र' च्या या जुन्या फाईलींचा उपयोग करून घेतला आहे. आजही उपलब्ध असलेले हे सर्व अंक म्हणजे या ठाणे जिल्ह्याच्या इतिहासाचा अमोल असा एक ठेवा आहे. 'सन्मित्र' वृत्तपत्राला भिवंडीचे सहकारमित्र शं. ना. लाठोरे यांची सहसंपादक म्हणून अनेक वर्षे साथ होती.

ठाणे जिल्ह्याच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक जडणघडणीशी 'सन्मित्र' चा साक्षात संबंध आहे. तर राजकीय वाटचालींची अलिप्तपणे नोंद करणारे 'सन्मित्र' हे वृत्तपत्र आहे.

'सन्मित्र' ने अनेक लेखकांना त्यांच्या प्रारंभीच्या काळात प्रसिद्धीला आणले. अनेक जण त्याचा मोठ्या मनाने उल्लेख करतात. 'सन्मित्र'ने अनेकांना लिहिते केले. जिल्ह्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांना मुक्तपणे स्थान देऊन

सचित्र प्रसिद्धी देण्याची 'सन्मित्र'ची भूमिका यामुळेच 'सन्मित्र' हे ठाणे जिल्ह्याचे सांस्कृतिक व्यासपीठ म्हणून ओळखले जाते. सामाजिक प्रश्नांना आणि सामाजिक संस्थांच्या कार्यांना 'सन्मित्र' ने नेहमीच निरपेक्ष भावनेने प्रसिद्धी दिली आहे. अनेक सामाजिक संस्थांच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा इतिहास 'सन्मित्र' मध्ये पहावयास मिळेल.

ठाणे जिल्ह्याची राजकीय वाटचाल 'सन्मित्र' मध्ये प्रतिबिंबित होते. परंतु राजकीय उखाळ्यापाखाळ्यांना मात्र 'सन्मित्र'ने कटाक्षाने दूर ठेवले आहे. बातम्यांना भडक स्वरूप देण्याच्या जमान्यातही दैनिक 'सन्मित्र'ने मात्र वस्तुनिष्ठ सौम्य मथळे देऊन जिल्ह्यातील राजकीय व इतर सर्व क्षेत्रांतील बातम्या देण्याचे पथ्य व वैशिष्ट्य सांभाळले आहे. दोन पिढ्यांतील ठाणेकर आपण आपल्या शालांत परीक्षेचा निकाल 'सन्मित्र' मध्ये पाहिला होता, अशी आठवण काढतात; हेही 'सन्मित्र' चे एक वैशिष्ठ्य आहे. ठाणे जिल्ह्यात वृत्तपत्रे अनेक झाली आहेत. परंतु ठाणे जिल्ह्याचा सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय प्रवासाचा साक्षीदार आणि इतिहास जतन करणारे वृत्तपत्र म्हणून 'सन्मित्र' चा उल्लेख करावा लागेल.

ठाणे जिल्ह्यात भरलेल्या राजकीय परिषदा, अधिवेशने, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांचे दरवर्षी होणारे विविध कार्यक्रम, स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी ते राजीव गांधी, अटलबिहारी वाजपेयी यांच्यापर्यंत अनेक मान्यवरांच्या ठाणे भेटीचा वृत्तांत, १९५४ साली झालेली मासुंदा तलावाची साफसफाई, शिवाजी पथाचे, गोखले रोडचे रुंदीकरण ते आयुक्त टी. चंद्रशेखर यांनी केलेले रस्त्यांचे रुंदीकरण, नौपाडा ग्रामपंचायतीचे विलीनीकरण ते आजच्या ठाणे महानगरपालिकेची वाटचाल, १९५६ साली झालेले लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचे अनावारण ते कोर्ट नाक्यावरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण, स्वातंत्र्य समर शताब्दी महोत्सव ते दरवर्षी राज्य नाट्य महोत्सव, साहित्य संमेलन आदी सांस्कृतिक कार्यक्रमांचे वृत्तांत, राजकीय नेत्यांची वाटचाल, प्रदीर्घ काळ चर्चिला जाणारा ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न ते पाणी पुरवठ्याचा प्रश्न असे अनेक विषय, अनेक व्यक्ती, अनेक प्रश्न 'सन्मित्र'च्या फाईलीमध्ये आपल्याला पहावयास मिळतील.

१५वर्षे सन्मित्रकार स.पां. जोशी यांनी मराठी भाषेच्या स्वाभिमानाचा लढा आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमाद्वारे दिला. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई, ठाणे परिसरांत होत असलेले मराठी भाषेवरील आक्रमण थोपवून मराठी भाषेबद्दल स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य त्या विषयानुषंगाने अनेक अग्रलेख प्रसिद्ध करून तसेच मराठी भाषिकांचा वाढदिवस संकल्प हा उपक्रम राबवून केला.

सन्मित्रकार स.पां. जोशी यांचे ८-८-२००४ रोजी दुःखद निधन झाले. त्यानंतर सौ. तनुजा विजय जोशी ह्या सन्मित्रच्या संपादक पदाची धुरा सांभाळत असून त्यांना विजय जोशी हे मोलाची साथ करीत आहेत.

'सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र वृत्तपत्र गौरव ग्रंथ',
या ग्रंथावरून साभार

*दै. सन्मित्रच्या संपादिका सौ. तनुजा विजय जोशी यांनी या निमित्ताने 'दिशा' साठी लिहिलेले मनोगत पुढे देत आहोत.*

*- संपादक*

# 'सन्मित्र' : मनोगत

'सन्मित्र' ने ६१ वर्षे पूर्ण केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तसे लगेचच म्हणजे १९४९ साली 'सन्मित्र' वृत्तपत्राची मुहूर्तमेढ माझे सासरे स.पा. जोशी यांनी रोवली. तो दिवस होता भाऊबीजेचा. एका सद्‌भावनेने आणि सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आवडीतून 'सन्मित्र'चा जन्म झाला. त्या काळी वर्तमानपत्रे फार कमी होती. आणि ती काढणे आणि चालविणे आजच्या एवढे तांत्रिकदृष्ट्या सोपे नव्हते. परंतु एक मुद्रक म्हणून तांत्रिकदृष्ट्या समर्थ असलेल्या स.पा. जोशी यांनी 'सन्मित्र' हे वृत्तपत्र प्रदीर्घ काळ नियमितपणे प्रसिद्ध केले. साप्ताहिक असतांना जिल्ह्याच्या हरएक तालुक्यामध्ये पोस्टाद्वारे पोहचलेल्या 'सन्मित्र' ची लोक आवडीने वाट बघत. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कायकर्ते, नेते मंडळी आपले हक्काचे एक व्यासपीठ म्हणून 'सन्मित्र' कडे पहात. आज जग खूपच गतिमान झाले आहे. क्षणाक्षणाला 'ब्रेकिंग न्यूज' देऊ लागले आहे. पण त्याकाळी लोक साप्ताहिकाची देखील आतुरतेने वाट पहात असत.

माझे पती विजय जोशी त्यांच्या बालपणापासूनच 'सन्मित्र' च्या वाटचालीत सामील झालेले होते. १९८० पासून बऱ्याच प्रमाणात सासरे स.पा. जोशी यांना सन्मित्रच्या दैनंदिन वाटचालीत मदत करत होते आणि मलाही मदत करीत आहेत. किंबुहना १९८२ साली सन्मित्र दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागले ते विजय जोशी यांच्या सक्रिय सहभागामुळेच. त्यापुढील सन्मित्रच्या वाटचालीत स.पां. जोशी यांच्या समवेत विजय जोशी यांचा सहभागही महत्त्वपूर्ण आहे. दैनिक वृत्तपत्र चालविणे ही तशी सोपी गोष्ट नाहीच. जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि ध्यास घ्यावा लागतो तेव्हा दररोजच्या वृत्तपत्राचा जन्म होतो. एका व्यक्तीने, एका कुटुंबाने चालविलेले दैनिक वृत्तपत्र हे तसे कठीण. कामाच्या व्यापामुळे अनेक सुखाच्या क्षणांचा त्याग करावा लागतो. तो सर्वांना सांगून समजणार नाही. अन्य व्यवसाय आणि वृत्तपत्र व्यवसाय यात महद् अंतर आहे. दररोजची जबाबदारी, बांधिलकी मोठी असते. ती सांभाळत उपलब्ध सामग्री आणि मर्यादा सांभाळीत वाटचाल करावी लागते. ही एक तारेवरची कसरतच असते. श्रमांची पर्वा न करता राब राब राबले तरी कधी ना कधी माणूस म्हणून थकायला होणे साहजिकच आहे. परंतु दैनिक वृत्तपत्राच्या वाटचालीत गाडा पुढे रेटावाच लागतो, 'शो मस्ट गो ऑन' प्रमाणे.

या वाटचालीची, या कठोर परिश्रमांची नोंद जेव्हा कोठे घेतली जाते तेव्हा तो क्षण नक्कीच सुखाचा शिडकाव ठरतो. २६ सप्टेंबर २०१० रोजी पुणे येथे एका विशेष समारंभात प्रदीर्घ काळ प्रसिद्ध होणाऱ्या महाराष्ट्रातील वृत्तपत्रांमध्ये 'सन्मित्र' चे संपादक म्हणून आम्हा उभयतांचा सत्कार महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी या पत्रकारांच्या राज्यव्यापी संघटनने केला. तोही महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त. तेव्हा तो आमच्या दृष्टीनेही सुवर्णाचाच क्षण होता. एक कृतार्थता या सत्काराने आम्हाला लाभली.

'सन्मित्र'ची आतापर्यंतची वाटचाल ही आम्ही आमच्यापरीने करण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढील वाटचाल अधिक उज्ज्वल व्हावी यासाठी आता काहीतरी वेगळा निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असे अलिकडे जाणवत आहे. योग्य निर्णय घेण्याची सद्‌बुद्धी आम्हाला होवो हीच इच्छा.

**सौ. तनुजा विजय जोशी**
पितृस्मृती, जिल्हाधिकारी कर्यालयासमोर,
ठाणे ४०० ६०९

पुस्तक परिचय

# ‘वैष्णवांचा मेळा’ संतचरित्रांचा मर्मग्राही परिचय

*दिशाचे लेखक माननीय शंकरराव मठ यांच्या पुस्तकचा हा परिचय – संपादक*

संताची चरित्रे वाट चुकलेल्या भ्रमलेल्या माणसाला मार्ग दाखवतात, या स्वानुभावातून ठाण्यातील तत्वचिंतक व भारतीय तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करणारे अभ्यासक श्री. शंकरराव मठ यांनी वैष्णवांचा मेळा हे संत चरित्राचा संग्रह असणारे पुस्तक सिद्ध केले. सत्य संतसेवा व संतकृपा ही श्रीहरी मंदिरात शिरण्याची तीन दालने आहेत या दालनांतून गेल्यास श्रीहरीचे दर्शन होते या आध्यात्मिक प्रेरणेतून श्री. मठ यांनी ही संताची चरित्रे लिहिली आहेत.




वास्तविक या प्रत्येक संताची स्वतंत्र चरित्रे असताना वेगळ्या पुस्तकाची गरज आहे का, असा प्रश्न एखाद्याच्या मनात येईल, पण थोडक्यात नेमकेपणाने संतपरंपरेतील सर्वच संतांचा परिचय उपलब्ध करून देण्यासाठी हे पुस्तक विशेष उपयुक्त आहे. खास करून शाळांमध्ये मराठी, इतिहास यांसारखे विषय शिकवणारे शिक्षक, या विषयांत रस असणारे विद्यार्थी यांच्यासाठी तर हे पुस्तक फार उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे शाळांच्या शिक्षक ग्रंथालय, विद्यार्थी ग्रंथालय येथे याच्या प्रती आवश्यक ठरतील. त्याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालयातही हे पुस्तक उपलब्ध होणे ही गरज आहे.

संत साहित्याचा फक्त संत जीवनाचा रुक्ष परिचय यात नाही. तर त्यांच्या जीवनातील घटना, त्यांच्या साहित्यातील अवतरणे, यांमुळे हे पुस्तक वाचनीय झाले आहे. श्री संत चोखामेळा यांच्यावरील लेखाच समारोप करताना श्री. शंकरराव मठ यांनी संतचरित्रांचे कार्य काय याबद्दल नेमक्या शब्दांत सांगितले आहे. ते म्हणतात, ‘‘संत महात्मे स्वत:निर्मळ व धर्मशील असे आचरण करून सामान्य लोकांना आदर्शभूत होतात. भेदाभेद, व्देष, मत्सर इत्यादी अवगुणांचा नायनाट करून दया, सहिष्णुता, परोपकार, मालमत्ता इत्यादी गुणांची कास धरण्यास ते आम्हांस प्रवृत्त करत असतात. यासाठी संतचरित्राचा अभ्यास करणे अनिवार्य आहे.
(पृ. ८५)

असा अभ्यास करण्याची प्रेरणा हे पुस्तक वाचल्याने नक्कीच मिळू शकते. प्रत्येक संताचे घराणे त्यांच्या आयुष्यांतील घटना इ. सर्व तपशील तर या लेखांत आहेतच पण त्यांनी आपल्या रचनांमधून दिलेला जीवन दृष्टीचा, शिकवणीचा परिचयही लेखांमध्ये आहे. उदा. ज्ञानदेव व नामदेव यांच्यातील संत (पृ. २४) श्री संत सेनामहाराजांचे महाराष्ट्रातील कार्य (पृ. १०५) इ.

ग्रंथाची निर्मिती मुद्रण व मांडणी या दृष्टीने ग्रंथ उत्तम झाला आहे. मात्र यातील प्रत्येक संतपरिचयात संबंधित संताचे छायाचित्र देणे आवश्यक होते. तसेच काळाचा उल्लेख शालिवाहन शकानुसार केलेला आहे. अनेक

ठिकाणी संबंधित इसवी सन  इसवीसनातही (ख्रिस्ताब्ध) दिले आहे त्याऐवजी इसवी सन सर्वत्र वापरले असेल तर विद्यार्थ्यांचा आकलनाच्या दृष्टीने ते सोयीचे ठरले असते.

या पुस्तकाचा उल्लेखनीय असा दुसरा विशेष मध्ये पृ. २१० ते २४० चा तीन पृष्ठांत संताचे अभंग उद्धृत केले आहेत. अभ्यासकांच्या दृष्टीने ही मोठी सोय आहे. मनोगत श्री. शंकरराव मठ यांनी नेमक्या शब्दांत दिले आहे. त्यात म्हटल्यानुसार ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या दिशा या विचारपरिप्लुत मासिकात यापूर्वी हे लेख येवून गेले आहेत. संबधित अंकांच्या तारखांचे वर्षांचे तपशील लेखाच्या शेवटी येणे आवश्यक होते. श्री. शंकरराव मठ यांनी अर्पणपत्रिकेत ग्रंथसेवा हा अतिशय समर्पक शब्द वापरला आहे. आपली ही 'ग्रंथसेवा' त्यांनी संतांच्या चरणी अर्पण केली आहे.

संत साहित्यावर प्रेम असणाऱ्या, त्याबद्दल जिज्ञासा असणाऱ्या प्रत्येकाने वाचायला हवा असा हा ग्रंथ आहे

**मोहन पाठक, ठाणे**

वैष्णवांचा मेळा (संतचरित्रे)

**– मठ, शं. बा.**

ठाणे, अरविंद प्रकाशक, २०१०

पृष्ठे २४० मूल्य रु. १५०/०– फक्त

●●●

दिशा
नियमित
वाचा.

*आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.*

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दुःखतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दुःखावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दुःखाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# भारतीय संस्कृती - बीज मॉडेल व साधना

*साहित्य संमेलनातून निर्माण होणाऱ्या काही मूलभूत प्रश्नांवरील हा लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील महिन्याच्या अंकात आपण ठाण्यातील ८४ व्या साहित्य संमेलनाच्या संदर्भात अतिशय ढोबळपणे साहित्य संमलेने, संस्कृती व सामाजिक परिवर्तन यासंबंधी विचार केला. साहित्य म्हणजे काय - त्याचा संस्कृती घडवण्यात व समाज परिवर्तनात काय प्रभाव पडतो - आधिक, उणे प्रमाणात व सात्विक, तामासिक गुणात हे ही पाहिले. समाजशास्त्रीय, राजकीय तत्त्वज्ञानांच्या प्रभावाचा साहित्य व संस्कृती त्याच्यांवर परस्पर प्रभाव काय पडतो तेही पाहिले.

**मराठी साहित्य दर्शन :**

सामाजिक नीतिमूल्ये, साहित्यिक कला मूलतत्त्वे व तत्सम विषयांचा खल, जो मराठी साहित्य संमेलनांत झाला, त्याचे कांही निष्कर्ष सुद्धा ओझरते पाहिले.

त्यावरुन एक 'दर्शन' असे घडले की ह्या साहित्य व संस्कृतीच्या पृथ्वीवरील स्त्रोताला मराठी साहित्य काही मूल्याधिष्ठित दिशा देऊ इच्छिते. जर हा एक वैशिष्ट्यपूर्ण हेतू असेल तर मराठी भाषेच्या संदर्भात **'महाराष्ट्र धर्म'** असे त्याचे एक पारंपरिक स्वरूप व पाया असूं शकेल. **पण ह्या पायाचे स्वरूप भारतीय संस्कृतीच्या मुख्य प्रवाहाचेच एक अंग असणे स्वाभाविकच असणार. ह्याचे विस्मरण होऊन चालणार नाही!!**

ह्या प्रवाहाला योग्य मार्गावर ठेवण्याचा यत्न करणारा माणूस व समाज हा स्वत:च **सांस्कृतिक प्रवाहाचा यात्रिक** असतो व त्याच्या सृजनशील शास्त्रे व नूतन मूल्यांच्या नवनिर्मीतीमधून ह्या प्रवाहाला विशिष्ट धारणा प्राप्त होऊ शकतात.

१९४९ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या स्वप्नांचा आढावा **आचार्य जावडेकर** यांनी घेतला, त्यात **'सामाजिक मूल्यांच्या नवदर्शनाचा'** हेतू गृहीत धरला होता. किंवा अभिप्रेत होता, व त्याची जबाबदारी **विनोबा भाव्यांच्या क्रांतीच्या त्रिकोणांत व्यक्त होणार होती.**

**१. मतपरिवर्तन**

**२. हृदय परिवर्तन**

**३. परिस्थिती परिवर्तन**

पण हे होणार कसे ?

ह्या परिवर्तन घडवून आणणाऱ्या शक्ती कोणत्या ? त्या परिवर्तनाला विरोध करणाऱ्या शक्ती कोणत्या? मदत करणाऱ्या कोणत्या? ह्या परिवर्तनाची दिशा व स्वरूप काय!

ह्याचा विचार कुठेही जाणीवपूर्वक होताना दिसत नाही. कारण, उघड आहे!!

**परिवर्तनाच्या प्रत्यक्ष क्रिया :**

हे परिवर्तन काही शून्य आकाशात होत नसते, तर त्याला आध्यात्मिक **राजकीय, आर्थिक, सामाजिक 'कॅनव्हास'** असतो.

**त्याचा मार्ग विरोध विकास वादासारख्या समीकरणांवर आधारलेला असतो. परिवर्तन घडवून आणणाऱ्या शक्तिस्त्रोतांचे ज्ञान असावे लागते. एवढेच**

<u>**नव्हे तर ह्या स्वप्नाळू सामाजिक माणसाच्या अंतरंगातही परिवर्तन व क्रांती व्हावी लागते.**</u> आणि ह्या स्वप्नांची स्वरूपे काय असतात? सबंध मानव जातीच्या अव्यक्त स्वप्नांचा शोध घेतल्यास मराठी माणसांमध्ये त्या स्वप्नांची गृह्ये कोणती दृष्टीस पडतात?



**महायोगी अरविंद**

त्यांचा थोडक्यात परामर्ष <u>**योगी अरविंद**</u> यांनी मांडला आहे.

**"The Human Aspirations :**

Man's highest aspiration - his seeking for perfection, his longing for freedom and mastery, his Search after pure Truth and unmixed delight - is in flagrant Contradiction with his present and normal experience.

Such Contradiction is part of Nature's general method, it is a sign that she is working to wards a greater harmony The reconcilliation is achieved by an evolutionary programs"

''मानवाच्या श्रेष्ठ अभित्सा - परिपूर्णतेचा शोध, पूर्ण स्वातंत्र्याच्या व अधिकाराच्या आकांक्षा, पूर्ण सत्याचा शोध आणि निर्भेळ आनंदाची प्राप्ति - ह्या त्याच्या सद्य:स्थिती व सर्वसाधारण अनुभवाशी अत्यंत लाजिरवाण्या विसंगतीत सांपडलेल्या दिसतात!!


पण, अशी विसंगती ही सुद्धा सृष्टीची एक पद्धत असते. कारण त्याचा खरा अर्थ, सृष्टी एका उच्च स्तरावरील जीवनाचा सुसंवाद व संगती साधण्याच्या प्रयत्नात कार्यरत असते, हा असतो, हा सुसंवाद किंवा एकवाक्यता हा उत्क्रांती तत्वावर साधला जात असतो!!''

योगी अरविंदांच्या ह्या विधानांचा मथितार्थ असा आहे कीं युगायुगांमध्ये मानवाच्या त्याच्या आशा, आकांशा, स्वप्ने व जन्मजन्मांतराच्या वैश्विक चकोत जीवात्म्याच्या 'अभित्सा' (Aspirations) ह्या एका विरोध-विकास तत्त्वांवर आधारलेल्या उत्क्रांती तत्त्वावर कार्यरत असतात''

त्यामुळे आपल्या विचारवंताना जे व्यक्ती व समाज ह्यांचे मतपरिवर्तन, हृदय परिवर्तन व त्यांच्या परिस्थितीत, सामाजिक व परिसरातील व्यवस्थेमधील परिवर्तन व्हावे असे वाटत असते, त्याला काही 'विरोधी शक्ती' अडवणूक करत असतात तर काही नैसर्गिक वा दैवी शक्ती मदतही करत असतात. संस्कृतीची वाटचाल ह्या तऱ्हेच्या व्यूहरचने मध्ये होत असते. तेव्हा, ही विरोधी व पूरक शक्तीची स्वरूपे कोणती हे जाणणे आवश्यक आहे.


**दोन मार्ग :**

ह्या प्रश्नांचा विचार दोन पद्धतीने बघितला जातो आहे. ज्या पद्धतीला भौतिकवादी संबोधता येईल तिचा भर फक्त <u>**मानवी**</u> व मानवी समाजातील <u>**शक्तीवरच**</u> आहे. २१ व्या शतकांतील सुप्त वा प्रत्यक्ष विचारधारा पहिल्या तर त्या <u>**'मार्क्सिस्ट'**</u> वा <u>**'भौतिक विज्ञानवादी'**</u> आहेत असे आढळते.



**कार्ल मार्क्स**

अत्यंत ढोबळपणे सांगावयाचे झाल्यास **कार्ल मार्क्सच्या** भौतिक **'आर्थिक व वर्ग विरोध विकास वादावर'** आधारलेल्या चष्म्यातून ह्या परिवर्तनाचा मार्ग शोधला जातो. तो नजीकच्या इतिहासातच काही अंशी यशस्वी, तर, राजकीय स्तरावर अपयशाने संपलेला आढळेल.





**म. गांधी व विनोबाभावे**

'गांधीवादी परिवर्तन' हे भौतिक व थोड्या अंशाने आध्यात्मिक (आत्म्यासंबंधाने) शास्त्र व तत्त्वांवर आधारलेले आहे. पण त्याचा भारतातला बदल संभाळणाऱ्या वारसायुक्त राजकीय पक्षाने काँग्रसने हातात सत्ता असूनही त्या मार्गाची पूर्णपणे विकृती करून टाकली आहे किंवा त्यांचा ह्या तत्त्वज्ञानावरचा विश्वास पूर्णपणे उडालेला दिसतो आहे.

काय बरे असावे याचे कारण?

याचे एक उघड कारण असे आहे की ह्या सर्व संकल्पना व पद्धतीचे विश्वास हे मार्क्स, गांधी, विनोबा भावे वगैरे मानवी व्यक्तींच्या 'विश्वसंकल्पनेवर' आधारलेले आहेत. हे परिवर्तन वरवरचे नव्हे तर 'आत्मिक चित्त बुद्धी, मन, अहंकार स्तरांवर व्हावे लागते. "Not at Surface level !!" विश्वाच्या 'पूर्ण सत्याचा' त्यांना पत्ता लागलेला नाही. शिवाय भौतिकवादी युरोपियन यंत्र संस्कृतीप्रमाणे ज्यांनी समाजशास्त्राची कल्पना राबविली, त्या थोर व्यक्तींनाही खऱ्याखुऱ्या 'अध्यात्माशास्त्राची' व त्यांतील संस्कार शास्त्राची माहिती व ज्ञान नव्हते. याचे कारण अध्यात्मशास्त्राची ज्ञान संकल्पना व ज्ञान साधने वेगळी आहेत.

कार्ल मार्क्स या बाबतीत "Matter" ह्या संकल्पनेची बीजकल्पना पदार्थविज्ञान शास्त्र (Physics) च्या न्यूटनच्या काळातील आहे व त्यावर आधारलेल्या 'परिवर्तनाच्या बदलाला' त्रिगुणांनी पछाडलेल्या मानवी विचारांची व राज्ययंत्रणेची मदत गृहीत धरावी लागली.




**The Fallacy of Karl Marx**

"The Fallacy of Karl Marx" ह्या किशोर गांधी यांच्या पुस्तकातील कांही विधाने पहा–

"The self-contradiction in inherent in his Karl Marx very conception of matter from which his theory of materialism is derived. He endows Matter with an inner, self conscious, self directing free will, acting independently and fulfilling inevitably its purpose by an intelligent process. But an entity enclosed with these capacities cannot conform to the materialist's scientific conception of matter.

In scientific materialism Matter can never be dialectical because the dialectical process necessarily implies self-conscious free will and purposive intelligent direction.

Any teleological or consciously purposive movement, would be impossible to it by its very nature."

The basic contradiction in Socio-onomic theory of historical materialism and constantly suffers from the same serious drawback." [P-24-25 – The Fallacy of Karl Marx]

कार्ल मार्क्स म्हणतात –

पदार्थ-वस्तू (Matter) ह्या बीज संकल्पनेच्या कार्ल मार्क्स याच्या अर्थाबद्दल तो स्वतःच्या 'स्वखंडनाच्या' भूमिकेत सापडला आहे. ह्या मूळ पदार्थ संकल्पनेवर त्याचे भौतिकवादी तत्त्वज्ञान गर्तेत किंवा 'वैश्विक असत्यावर' गडगडले आहे (Cosmic unreality or untruth). पदार्थ ह्या शब्दाला वा संकल्पनेला तो एक अंतर्गत, स्वसंवेद्य (ज्ञानेश्वरांचा योग्य शब्द), स्वतंत्र निर्णयशक्ती व स्वतंत्र प्रज्ञा बहाल करतो, कीं जिच्या शक्तिमुळे हे पदार्थ-वस्तू स्वतःच्या मुक्त स्वातंत्र्यक्षमतेवर स्वतःची उद्दिष्टे व हेतू पूर्ण करू शकतात.

पण, विज्ञानवादी भौतिकवादाच्या पदार्थ (Matter) ह्या संकल्पनेत हा अर्थ वा शक्ती बिलकूल संभवत नाही.

विज्ञानवादी भौतिकवादी शास्त्रात पदार्थवस्तू ही विरोध-विकासवादी उत्क्रांतीचा विषय होऊच शकत नाही, कारण, विरोध-विकासवादी उत्क्रांतीमध्ये अभिप्रेत असते, ती म्हणजे, स्वसंवेद्य जाणीव व शक्ती आणि ठोस गार्भित 'दिशा गमन'!! कुठलीही 'सोपान पद्धति' (Teleological) उद्धारासाठी किंवा जाणीवपूर्वक हालचाल वा गती-गमन वगैरे प्रकार तिच्या स्वभावतच अंतर्भूत नाही!!

ही मूलभूत चूक किंवा पूर्ण विसंगतीमुळे कार्ल-मार्क्सच्या सामाजिक-आर्थिक -इतिहासवादी भौतिकवादाला धक्का देते. (वैश्विक असत्यता प्रदान करते माझी टीका) [Cosmic - unreality or untruth].

**ज्ञानाच्या व्याख्या भौतिक की आध्यात्मिक**

माझ्या काही विधानांचे गांभीर्य व सत्यकथन लक्षात न आल्यास माझ्यावर औद्धत्याचा आरोप साहजिकच होऊ शकेल.

**अध्यात्मशास्त्राची 'ज्ञानाची' व्याख्या** ही भौतिक पातळीवरील जीवनाची नाही, हे कटू सत्य प्रथम पचवावयाला लागते. त्यामुळे जड ज्ञानामध्ये जे विधान जे विद्वान म्हणून गणले जातात ते पूर्ण ज्ञानी नव्हते व म्हणून पूर्ण गुरुही नाहीत!! इथे 'आत्मज्ञानाची' पातळी आहे. **शरीरांतर्गत ज्ञानामध्ये मिळालेले ज्ञान हे 'मिश्र' स्वरूपाचे असते.**

हे मिश्रण **Finite Logic** म्हणजे मर्यादित तर्कपद्धतीवर आधारलेले असते, तर **Infinity Logic** म्हणजे 'अनंत तत्त्वावरील तर्कपद्धती' वा 'वैश्विक धर्म (कायदा)' ह्याला ''शब्दज्ञान'' किंवा ''स्वरज्ञान'' किंवा **"Truth Consciousness Realisation"** असे संबोधले जावे.

मानवी शरीर हे 'Embodied Consciousness' ह्या पातळीवर पृथ्वीवरील जड स्वरूपात आहे. शरीरबद्ध असते शरीर तर नाशिवंत आहे.

**भारतीय संस्कृतीतील अध्यात्मिक जाणीव अविभाज्य होय**

**भारतीय संस्कृतीत ह्या जाणीवेची आवश्यकता सतत वाळगली जाते आणि त्यामुळेच ह्या संस्कृतीचे वेगळेपण व वैशिष्ट्य जाणणे हे अत्यंत आवश्यक आहे. ''शब्द ज्ञान'' हे अपौरुषेय व साक्षात्कारी आहे. सत्य व शुद्ध स्वरूपात आहे.**

**भौतिक शास्त्रे अर्धसत्य**

**ह्या पार्श्वभूमीवर समाजशास्त्र, राज्यशास्त्र व विज्ञानशास्त्र ही सर्व शास्त्रे एका ''मिश्र स्वरूपाची**

**आहेत''–''अर्धसत्य'' आहेत.** तेव्हा जर साहित्य, कला व इतर भौतिक शास्त्रे ही एका अत्यंत श्रेष्ठ संस्कृतीतील **'जीवनमूल्ये'** शोधत असतील आणि त्यांची स्थापना व वृद्धी एका **विशिष्ट भूभागावर** व त्यावर रहाणाऱ्या–जगणाऱ्या समाजावर इच्छित असतील तर त्या कला व साहित्याला ह्या **धर्मगुणांची प्राप्ती** होणे, जपणे हे आवश्यक आहे.

**हे जमत नसेल तर साहित्याचा व कलेचा हा निर्जीव पाऊस, हा दगड धोंड्यांवर पडलेल्या पर्जन्यवृष्टी सारखाच शुष्क व वांझ ठरेल!!**

**मराठी भाषा बीज**

मराठी साहित्य सृष्टिपरंपरेला ह्या **मूळ बीज 'देवभाषा' संस्कृत** ची श्रेष्ठ परंपरा लाभली आहे. त्यामुळे, कित्येक अन्य परकीय भाषांच्या तुलनेने तिला ह्या **'सत्यविश्व दर्शनातील' शाश्वत अनंततत्वाच्या ज्ञानाचा वारसा लाभला** आहे.

पण, मेकॉले शिक्षणपद्धती व भौतिकवादी ग्लोबल्याझेशनच्या सांस्कृतिक हल्ल्यात, काही फायदे सोडल्यास, मराठी भाषा ही आपल्या परंपरेची नाळ तोडून बसली आहे!!

वेद ज्ञानातही उपासना, तंत्र, यंत्र, मंत्र व योग ह्यांच्या सहाय्याने वेद ज्ञानाला बोधज्ञानात रूपांतर करणाऱ्या साधनांतील गूह्य सत्य गमावले गेले आहे.

**ईश्वरप्रणिधान हवे**

मूळ आगम साधनांचे स्वरूप शोभिवंत, प्रतीकात्मक, प्रतीकात्मक व 'दर्शनी' स्वरूपात अज्ञानी झाले आहे.

ह्या दोन्ही दोषांना नाहीसे करण्याचे यत्न व्हावयाला हवेत. समाजमन व समाजस्वाथ्य व समाज जीवन हे सध्या जीवनाच्या प्राथमिक गरजा भागवण्यात हतबल होऊन बसले आहेत.

पण, नियतीच्या विश्वचक्रात हा काळ सुद्धा बदलणार आहे. फक्त त्या अनुकूल बदलाला **'इश्वरप्रणिधान'** लाभावे असे समाजमनाला वटल्यास ही **'स्वागतार्ह क्रांती'** होऊन **ही भूमी खरीखूरी 'आर्यभूमी' होऊन मराठी भाषेमार्फत ही ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या लाभाला प्राप्त करू शकेल.**

डिसेंबर २०१० ठाणे संमेलनाच्या अपेक्षा?

ठाणे येथे डिसेंबर २०१० रोजी भरलेल्या ८४ व्या साहित्य संमेलनात हा विचार प्रसृत व्हावा अशा अनेक मराठी बांधवांच्या अपेक्षा असणे शक्य आहे.

पण, साहित्य संमेलनाच्या मूळ उद्दिष्टांपासून पुष्कळ अंशी आपण किती भरकटले आहोत ह्यांची कल्पना आली!!

तो मूळ भारतीय श्रेष्ठ जीवनामूल्यांचा प्रवाह व अनंतातील मानवी सांस्कृतिक स्त्रोताची दोरी पकडून आपण ह्या 'त्रिकोण परिवर्तानाच्या' उद्योगाला लागू या.

पण, ह्या परिवर्तनातील एक मुख्य समाजशास्त्रीय महायोगी अरविंद (पाँडिचेरी) यांच्या "Integral Sciology" म्हणजे 'एकात्म समाजशास्त्र' ह्यावरील संशोधित शास्त्राचा संक्षिप्त परिचय करून देण्याचा माझा मानस आहे.

त्याकरिता 'दिशाच्या' पुढील अंकाची वाट पाहू या!
।।कृष्णार्पणमस्तु ।।

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# अध्ययन अक्षमता आणि पालकत्व

*मुलांमधील अध्ययन अक्षतांचे अनेक प्रकार असतात. या अध्ययन अक्षतांचा अभ्यास हा वैद्यकीय मानसशास्त्रातील संशोधनाचा विषय आहे. त्यासंबंधाने ही माहिती - संपादक*

आपल्या पाल्याला शिकवणे म्हणजे त्याला आपल्या दृष्टीने नामांकित वा बऱ्यापैकी शाळेत घालणे, त्याने वेळच्या वेळी शाळेत जावे व अभ्यास करावा अशी अपेक्षा करणारे पालक खूप असतात. असे पालक मुलाचे वा पाल्याचे जन्मदाते असतात; पण पालकत्व म्हणजे काय याचा त्यांना गंधही नसतो. मूल शाळेत जाणे व तेथे त्याने शिकणे, शिकल्यावर खूप खूप मार्कांनी पास होत राहणे एवढेच शिक्षण असते तर मन नसणारी कोणतीही गोष्ट सुशिक्षित झाली असती मेरिटमध्ये दुसरा व त्यापुढील क्रमांक या संकल्पनाच संपल्या असत्या.

पण असे होत नाही. का होत नाही याचे सोपे उत्तर म्हणजे मूल ही निसर्गतःच मन असणारी, त्या मनाच्या बऱ्यावाईट, कमी अधिक क्षमता असणारी गोष्ट आहे, जिवंत अस्तित्व आहे. आडात नाही तर पोहऱ्यात कोठून येईल ही आपल्या भाषेतील म्हण फार महत्त्वाची आहे. आई बाप झाल्यावर आपल्या मुलाला खूप मार्क मिळावेत असे वाटणारे आईबाप त्यांच्या शैक्षणिक जडणघडणीचा, वंशपरंपरेचा विचार करत नाहीत. पैसा खर्च केला, सर्व सोयी सवलती दिल्या म्हणजे आता मूल शिकले पाहिजेच असा हट्ट घेऊन ते जगतात. त्यासाठी 'काम दाम दंड भेद' यासर्वांचा वापर करतात व आपण आपल्या मुलावर संस्कार करतो आहोत अशा समजुतीत वावरतात. 'संस्कार करणे' म्हणजे फूटपट्टीने मोजावे तसे मोजून मापून काही करण्याचा विषय आहे काय?

या संदर्भात पुढील काही मुद्दे पालकांनी विचारात घेणे गरजेचे आहे. १) आपले मूल आपल्यासारखेच होईल, ही शक्यता मान्य करावी. २) कोणत्याही स्थितीत आपल्या मुलाची इतर मुलांशी तुलना करू नये. ३) मूल हे जिवंत अस्तित्व आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक क्षमता त्यात आहेत. ते यंत्र वा निर्जीव गोष्ट नाही. ४) हाताची पाचही बोटे सारखी नसतात.

अमीर खानचा 'तारे जमींपर' हा चित्रपट आला, सुंदर आहे, छान आहे. म्हणून लोकांनी तो पाहिला व इतर चित्रपटांप्रमाणे तो मागेही पडला. त्यामध्ये भाषिक अक्षमतेचा विचार खूपच चांगल्या पद्धतीने मांडला गेला होता. प्रत्येक पालकाने आपल्या मुलाच्या स्तुतीच्या विश्वात रमण्यापेक्षा व स्वतःची पाठ थोपटून घेण्याचा खेळ खेळण्यापेक्षा; त्याच्या एकूणच अडचणी काय आहेत, वाचन लेखनासारख्या यंत्रवत हालचालींपासून ते समाजात वावरण्याच्या सवयींपर्यंत आपले मूल ओळखायला शिकणे ही आपल्या पालकत्वाची गरज आहे. हाच अंतःप्रवाह- अंडरकरंट- या चित्रपटाच्या कथानकात होता. 'छान चित्रपट' असे लेबल लकवून विसरून जावा इतका तो सोपा नव्हता.

यावर 'आमच्या वेळेला असली थेरं नव्हती.' असे म्हणत भूतकाळ कुरवाळणारी एक पिढी नेहमी अडचणीं निर्माण करते. या पिढीच्या वेळेचे आता काय राहिले आहे, याचा सुज्ञ पालकांनी विचार करायला हवा. संस्कार करणे ही यांत्रिक कृती नाही, तर भावनिक बाब आहे हे ही विसरायला नको.

अक्षरे व त्या माध्यमातून भाषिक कौशल्ये आत्मसात करावयाच्या क्षमतेवर तारे जमींपरचे कथानक आधारित

आहे. मानसशास्त्र यात हा विषय येतो. ज्याप्रमाणे एखादे मूल भाषा अध्ययनात अक्षम असते त्याप्रमाणे अनेक प्रकारच्या अक्षमता असतात. आपल्या मुलाच्या बाबतीत अध्ययन शैलीचा आपण विचारच केलेला नसल्याने हे आपल्याला जाणवत नाही. या अध्ययन अक्षमतेला (लार्निंग डिसलॅबिलिटी) डिस्लेक्शिया अशी संज्ञा आहे.

अशाच प्रकारे गणिताची भीती असणाऱ्या बालकांमध्ये गणिताच्या अध्ययनाची सदोष शैली आढळते. गणिताचा पेपर, गणिताचा तास म्हटले की पोटात गोळा येणाऱ्या बालकांना गणितातील आकडे, त्यांच्या सापेक्ष किंमती समजत नाहीत. या विषयाच्या त्यांच्या ग्रहणशक्तीत कमकुवतपणा असतो. मानसशास्त्रात या अध्ययन अक्षमतेस डिसकॅलक्युलिया म्हणतात.

प्रत्येक मूल वेगळे असते. प्रत्येकात काही क्षमता उपजतच कमी तर काही चांगल्या असतात. तारें जमीनपर मधील मुलगा चित्रकार-रंग ज्ञानाचे अध्ययन यात चांगला असतो. आपल्या पाल्यातील हा भाग समजावून घेणे, वा अनुंषगाने त्याचा विकास होतो किंवा नाही, त्याला कोणत्या गरजा जाणवतात हे पाहणे, याला पालकत्व म्हणायला हवे. महात्मा गांधींनी या देशासाठी ज्या मूलोद्योगी शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला त्यात हे अध्याहत होते. मेकॉलेच्या पद्धतीत अडकल्यामुळे आपल्या पाल्यातून 'साहेब' वा डॉक्टर इंजिनियर घडावा हे स्वप्न अंर्तमनात जोपासत त्या मुलावर शिक्षण लादले जाते. जे. कृष्णमूर्ती म्हणतात त्याप्रमाणे ज्ञान आतून यावे लागते, बाहेरून टोचता येत नाही; या सत्याचा विचार व्हायला हवा.

विशिष्ट गोष्टीचे ग्रहण करण्यात अक्षम असणारी मुले असतात. आकार, आवाज इत्यादींच्या अध्ययनात ती विकसित नसतात. यास ग्रहण अक्षमता (पर्सेपच्युअल डिसऑर्डर) म्हणतात. मेमरी अॅफेक्टींग डिसऑर्डर त्यास समरण अक्षमता म्हणतात. नावाची अद्ययन अक्षमता स्मरणप्रक्रियेच्या संदर्भात कार्यरत असू शकते. अशा अध्ययन अक्षमतांचे अनेक प्रकार आपल्याला आढळतात.

या सर्व अक्षमतांचा व पाल्यातील क्षमंताचा अभ्यास करण्यासाठी मानसशास्त्राच्या शाळेत जाण्याची गरज आहे की काय, असा प्रश्न पालक म्हणून तुमच्या मनात येणे स्वाभाविक आहे! त्याचे उत्तर फार तांत्रिक संकल्पनाचा खोलात जाऊन अभ्यास करण्याची अपेक्षा नाही; पण आपले मूल ओळखणे, त्याच्यातील क्षमता, अक्षमता जाणून घेणे आणि गरज पडल्यास वैद्यकीय मानसशास्त्रज्ञाची (क्लिनिक सायकॉलॉजिस्ट) मदत घेणे इतकी मनाची तयारी हवी. आपले मूल हे आपल्या अस्तित्वाचा भाग असल्याने महत्त्वाचे असते. त्यामुळे, त्या मुलाला जाणण्याइतका, त्याचा विचार करण्याइतका वेळ हा द्यायलाच हवा. अन्यथा आपण आईबाप झालो, पण पालक होऊ शकलो नाही, ही खंत मनात राहील. ही खंत मूल हातातून गेल्यावर करत राहणे म्हणजे आपल्याला मिळालेले पालकत्व वाया घालवणेच असते. त्यासाठी आपण मुलाचे मित्र व्हायला हवे, 'मालक' नव्हे

**मोहन पाठक**
कार्यकारी संपादक, दिशा

*दिशाचा एप्रिलचा अंक काही अपरिहार्य कारणांनी उशिरा प्रकाशित होत आहे. आम्ही दिलगीर आहोत.*

*- संपादक*

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

**अभिनंदन :**

✯ नवी मुंबई कला संकुल आणि 'लोकमत' आयोजित चित्रभारती, ठाणे तर्फे भव्य चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ९ ब मधील अक्षता धुमाळ हीस तिसरे पारितोषिक मिळाले. पारितोषिकाचे स्वरूप १०,०००/- रु. रोख आणि ट्रॉफी असे आहे. आठ विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ रोख रु. ५००/- आणि ट्रॉफी असे पारितोषिक मिळाले.

✯ फोर्टीस हॉस्पिटिल आयोजित 'कॅन्सर पोस्टर' स्पर्धेत ऋषिकेश सुतार (१० वी ब) या विद्यार्थ्याला ट्रॉफी व प्रशस्तिपत्रक मिळाले तसेच ४५ शाळांमधून त्याचा प्रथम क्रमांक आला.

✯ शिवसेना आयोजित चित्रकला स्पर्धेत वैष्णवी नरेश वाणी या विद्यार्थिनीला २००१/- रु. चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

✯ 'डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक' स्पर्धेत इ. ६ वी अ मधील कु. ऋजुता नयन काबाडी ही सुवर्ण पदकाची मानकरी ठरली. तिला श्री. संजय देवघरे सरांचे मार्गदर्शन लाभले.

✯ महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या 'गणित प्रज्ञा परीक्षेत' इ. ८ वी अ मधील कु. प्रणिता हनुमंत काळभोर व इ. ६ वी अ मधील कु. ऋजुता नयन काबाडी या विद्यार्थिनींना रौप्य पदक आणि प्रशस्तिप्रत्रक मिळाले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

✯ **NSTSE युनिफाईड कॉन्सिल परीक्षा – २०११ निकाल :**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी : १२
उत्तीर्ण विद्यार्थी – ०९

✯ **रामायण परीक्षा २०१० – २०११ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी ३५
उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ३२

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | १४ | १२ | ५ |

✯ **गणित प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल २०११ – २०११ :**

ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ आयोजित गणित प्रज्ञा शोध परीक्षेचा निकाल खालील प्रमाणे लागला :

१) कु. सन्मय आघारकर – रजत पदक प्रमाणपत्र विजेता.
२) कु. शुभम पाटेकर – प्रमाणपत्र विजेता.

✯ **होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१०–२०११ प्रात्यक्षिक परीक्षेचा निकाल:**

होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत कु. नेहा पुसाळकर हिला रौप्य पदक मिळाले.

✯ **चित्रकला, हस्तकला व विज्ञान प्रदर्शन:**

दरवर्षी प्रमाणे यंदाही शुक्रवार, दि. १७ फेब्रुवारी

रोजी शाळेत, कला व विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात इ. ५वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी काढलेली सुंदर चित्रे तसेच वैविध्यपूर्ण वस्तू प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या.

**खालील प्रयोग / प्रकल्प विजयी ठरले :**

| इ. | प्रयोग / प्रकल्पाचे नाव | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी ते ७ वी | Waste Management with the Help of Garbage Robat | अद्वैत भट<br>अभिषेक क्षत्रिय<br>नितिश जोशी |
| ८ वी ते ९ वी | Hairy Idea | जान्हवी पाटील<br>मनाली करमरकर<br>ऋतुजा वाळंज |

**☆ जागतिक जल दिन :**

ह्या वर्षी इ.८ वी तील आमचे विद्यार्थी सानिका नवरे, उर्वी आर्यमाने आणि विराज महाडीक यांना ACC कंपनीत जल परीक्षणाचा प्रयोग दाखवण्याची संधी मिळाली.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय :

**मार्च २०११**

• डॉ. मेधा मुळगावकर, विभागप्रमुख, वनस्पतिशास्त्र विभाग

१. यांची मुंबई विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाच्या वनस्पतीशास्त्र अभ्यासमंडळात निवड झाली.

२. त्या Faculty of Science (फॅकल्टी ऑफ सायन्स) च्या सदस्य म्हणूनही निवडून आल्या.

३. त्यांना इंडियन बोटॉनिकल सोसायटी, मुंबई तर्फे Excelleuce Award प्रदान करण्यात आला.

डॉ. मोजेस कोलेट, सहयोगी प्राध्यापक, वनस्पतिशास्त्र विभाग

१. यांना इंटरनॅशनल बायोग्राफिकल सेंटर, केंब्रिज यांच्या तर्फे Fellow Award 2010 हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२. त्यांना आफ्रीकन जर्नल ऑफ बायोटेक्नोलॉजी, बायोनॅनोफ्रॉटीयर व सायंटीफिक रिसर्च अॅड एसेज या तीन आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकांच्या हस्तालिखितांचा आढावा घेण्याकरता निमंत्रित करण्यात आले होते.

• डॉ. मनोहर न्यायाते, विभागप्रमुख, भौतिकशास्त्र विभाग

यांची मुंबई विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या अभ्यासमंडळात निवड झाली.

• डॉ. कल्पना फळ, सहयोगी प्राध्यापक, संख्याशास्त्र विभाग

यांची मुंबई विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाच्या अभ्यासमंडळात निवड झाली.

• डॉ. माधुरी पेजावर यांची मुंबई विद्यापीठाच्या विज्ञान शाखेच्या अधिष्ठाता पदी निवड

**डॉ. माधुरी किरण पेजावर, प्राचार्या** आणि **विभागप्रमुख** प्राणिशास्त्र विभाग, यांची मुंबई विद्यापीठाच्या विज्ञान शाखेच्या अधिष्ठता या पदी दिनांक ८ मार्च २०११ रोजी नियुक्ती झाली.

मुंबई विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान विधी व अभियांत्रिकी अशा पाच मुख्य शाखा आहेत. यामध्ये विज्ञान शाखेच्या अधिपत्याखाली भौतिकशास्त्र. रसायनशास्त्र, गणित, संख्याशास्त्र, प्राणिशास्त्र,

जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, अर्थशास्त्र इत्यादी अनेक विषय शाखा आहेत. **अधिष्ठाता** पदाच्या नेमणुकीकरता या सर्व विषय शाखांमधून त्या विषयाचे तज्ज्ञ सदस्य निवडले जातात आणि या सर्व सदस्यांतून अंतिम टप्प्यावर **अधिष्ठाता** पदाची नेमणूक होते.

आजवरच्या विज्ञान शाखेमध्ये कोणत्याही महिला उमेदवारची **अधिष्ठाता** पदी नेमणूक झाली नव्हती. डॉ. माधुरी पेजावर या प्रथम महिला १०० व्या जागतिक महिला दिनी या पदी नियुक्त होत आहेत.

डॉ. माधुरी पेजावर या गेली ३४ वर्षे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. यामध्ये १२ वर्षे विभागप्रमुख, ११ वर्षे उपप्राचार्या, ५ वर्षे प्रभारी प्राचार्या व गेली ३ वर्षे प्राचार्या ही पदे भूषवत आहेत. त्यांच्या कारकीर्दीत महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती समितीचा 'अ' दर्जा पटकावला आहे तर २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षाकरता महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाचा **'उत्कृष्ट महाविद्यालय'** हा किताब मिळाला आहे.

दिनांक ८ मार्च २०११ रोजीच डॉ. पेजावर या अधिष्ठाता पदी रूजू झाल्या आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली आपल्याला विज्ञान शाखेमध्ये नवीन बदल व विद्यार्थीपयोगी गोष्टी अनुभवायला मिळतील.

**योग शिबीर :**

राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांकरता दिनांक ४ डिसेंबर ते २९ जानेवारी या कालावधीत योग शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये राष्ट्रीय छात्रसेनेच्या २६ जवानांनी हे शिबीर यशस्वीपणे पूर्ण केले. या शिबीराच्या समारोपाच्या दिवशी श्री. भास्करराव पटवर्धन, संपादक, योगप्रसाद, श्री अंबिका योग कुटीर, ठाणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या आयुष्यात नीतिमूल्यांचे महत्त्व त्यांनी सांगितले. तसेच तंदुरुस्त शरीर व प्रसन्न मन ठेवण्याकरता योगाचा अवलंब रोजच्या जीवनात करणे अतिशय आवश्यक आहे, असा सल्ला त्यांनी दिला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

✯ विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाच्या क्रीडा स्पर्धेचा भाग म्हणून दिनांक ५ व ६ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट, टेबल टेनिस, बुद्धीबळ, कॅरम, बॅटबिंटन, थाळी फेक, गोळा फेक धावण्याची स्पर्धा इत्यादी स्पर्धा आयोजित केल्या होत्या. सदर स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला.

✯ महाविद्यालयाने दिनांक १८ व १९ फेब्रुवारी रोजी 'युवातरंग' अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कला गुणांचे सादरीकरण केले होते. त्यामध्ये प्रामुख्याने गायन, नृत्य, मिमिक्री, अंताक्षरी इ. चा समावेश होतो. सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी भरपूर मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

✯ मराठी दिनाचे औचित्य साधून दरवर्षाप्रमाणे या ही वर्षी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाने 'मराठी दिवस' उत्साहात साजरा केला. सदर दिनानिमित्त 'विज्ञान तंत्रज्ञान आणि कायदा' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मराठी गीताचे गायन या स्पर्धेचे ही आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या कर्मचारी श्रीमती वसुधा शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**निबंध स्पर्धेचे विजेते**

१) आरती चव्हाण – तृतीय वर्ष विधी

२) यतिन माने - तृतीय वर्ष विधी

३) अलका माने - प्रथम वर्ष विधी

**गायन स्पर्धेचे विजेते**

१) आदिती आठवले - तृतीय वर्ष विधी

२) सोपान शिंगाळे - द्वितीय वर्ष विधी

३) यतनि पंडित - तृतीय वर्ष विधी

✯ मराठी दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रसिद्ध लेखक, कवि गीतकार प्रा. श्री. प्रवीण दवणे यांचा 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा' या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. शेवटी दवणे यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

✯ आमच्या महाविद्यालयाच्या अर्धवेळ प्राध्यापिका सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी U.G.C. ची जून २०१० ची NET परीक्षा उत्तीर्ण केली. महाविद्यालया तर्फे त्यांचे अभिनंदन!

✯ महाविद्यालयाच्या ग्रंथपाल श्रीमती शितल औताडे यांनी 'गोखले एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ एज्युकेशन मुंबई' येथे दिनांक १७ व १८ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या 'Electronic Collection Development ह्या राष्ट्रीय चर्चासत्रात भाग घेतला.

✯ विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी 'शिवाजीराव जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड रिसर्च' तर्फे आयोजित 'Law, Corporate Management and Labour welfare' या दिनांक ११ जानेवारी रोजी झालेल्या चर्चासत्रात 'Labour Legislations - The Human Rights Back Ground' या विषयावर व्याख्यान दिले.

✯ प्रा. श्रीमती मनीषा मोहन वाघ या त्रिनिटी गिल्ड हॉल कॉलेज ऑफ म्युझिक लंडन येथून पियानोची ग्रेड ५ ही प्रात्यक्षिक परीक्षा उत्तीर्ण झाल्या. महाविद्यालयातर्फे त्यांचे अभिनंदन!

✯ महाविद्यालयाच्या माध्यमातून दर वर्षाप्रमाणे याही वर्षी दि. २ मार्च रोजी डॉ. बेडेकर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर वादविवाद स्पर्धेमध्ये मुंबई व ठाणे येथील नऊ विधी महाविद्यालयांनी भाग घेतला होता. सदर स्पर्धेसाठी खालील विषय ठेवण्यात आले होते.

१) वकीलांना जाहिरात करण्याची परवानगी असावी का?

२) राज्यसभा रद्दबातल केली पाहिजे का?

३) संविधानाच्या अनुच्छेद १२४ (३) (क) मध्ये दुरुस्ती हवी आहे का?

स्पर्धेसाठी मुंबई उच्च न्यायालयात वकिली करणारे वरिष्ठ वकील श्रीमती जेन कॉम व श्री. एम. एम वर्मा यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत अडवाणी विधी महाविद्यालय, मुंबई यांनी प्रथम, तर के. सी. विधी महाविद्यालय, मुंबई व प्रवीण गांधी महाविद्यालय मुंबई यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे पारितोषिक मिळविले.

सदर स्पर्धेमध्ये अडवाणी विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी विनोद तलरेजा व के. सी. विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी फराह सारीगत हिने उत्कृष्ट वक्ता म्हणून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तसेच तृतीय पारितोषिक हे देवेन्द्र दवे व रेश्मा फर्नांडिज यांना मिळाले.



**कांगा मूट कोर्ट स्पर्धेतील प्रथम क्रमांचे मानकरी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्यासह**

✮ शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांनी आयोजित केलेल्या दि. ५ मार्च च्या सर जमशेठजी मेमोरियल कांगा मूट कोर्ट स्पर्धेमध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या टी. एम्. सी विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, अदिती आठवले, पूजा ओक व जयेश गोखले यांनी भाग घेऊन सदर स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक मिळविले. प्रथम वर्षे विधीचे विद्यार्थी जयेश गोखले यांना सर्वोत्कृष्ट वक्त्याचे पारितोषिक मिळाले.

✮ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक समारोह दि. १२ मार्च रोजी प्रांगणातील पेशवे हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. सदर समारोहामध्ये निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. जोशी व संस्थेचे सदस्य श्री. करंदीकर उपस्थित होते. पारितोषिक वितरणानंतर. श्री. जोशी व श्री. करंदीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी मोठ्या संख्यने विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

✮ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. रंजन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १२ मार्च रोजी रोजी कल्याण येथील आधारवाडी कारागृहाची भेट व ओळख आयोजित करण्यात आली होती. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सदर कारागृहाची माहिती करुन घेतली.

✮ विधी महाविद्यालयाच्या वरिष्ठ अर्धवेळ प्राध्यापिका सौ. आशा दातार ह्या दिनांक ३१ मार्च २०११ रोजी सेवा निवृत्त झाल्या. त्यांच्या निवृत्तीनिमित्ताने श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रीमती दातार यांनी त्यांचे मनोगत व भावना व्यक्त केल्या. सर्व शिक्षक व कर्मचारी वर्ग यावेळी उपस्थित होता. उपस्थितांच्या वतीने श्रीमती दातार यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन :

**विद्युत अभियांत्रिकी विभागाचे २०१० – ११ चे प्रकल्प प्रदर्शन :**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनकितन ठाणे या संस्थेच्या पारंपरिक अतिउच्च दर्जाच्या शैक्षणिक पातळीस अनुसरून यावर्षीदेखील विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण बौद्धिक पातळीवर प्रकल्प तयार करून संस्थेत त्याचे प्रदर्शन भरवले आहे. प्रदर्शन पाहता असे लक्षात येते की तंत्रशास्त्राचा वापर करुन समाजाभिमुख प्रकल्प बनविण्याकडे विद्यार्थ्याचा कल आहे.



**प्रकल्पाविषयीची माहिती देताना विद्यार्थी. सोबत प्रा. सौ. अनिस एलिस व विद्यार्थी.**

दिवसेंदिवस कमी होत जाणारे पारंपरिक उर्जास्त्रोत कमीत - कमी खर्चात जास्तीत वापर आणि अपारंपरिक उर्जा स्त्रोतांचा आधिकाधिक वापर यावर विद्यार्थ्यांचा भर दिसून आला. आणि बहुतांशी विद्यार्थी त्यात यशस्वीही झाले उदा. जगात तसेच देशात सर्वात जास्त उपलब्ध असलेल्या सौर उर्जेचा वापर ट्रॅक्टरमध्ये करुन लागणाऱ्या इंधनात कशा प्रकारे मोठी बचत शक्य आहे हे "Solar Powered Tractor" या प्रकल्पामध्ये दिसून येते. आणि "Solar Energy System for Rural development", हा प्रकल्प ग्रामीण विकासाकरिता सौर उर्जेचा वापर दर्शवतो. "Wireless Power Transmission", म्हणजे वायरचा वापर न करता उर्जा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवणे याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणता येईल. "Vertical Axis Wind Mill Engery Consercation in illumination" रेल्वेमधील होणारा उर्जा वापर कमी होण्याकरिता "Energy Conservation in Railways" असे उर्जा बचतीचे विविध मार्ग विद्यार्थ्यांनी प्रकाशात आणण्याचा पेयत्न केला आहे.

श्री. ओक व श्री. किरण देशमुख या विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रात मुरलेल्या व्यक्तींनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रकल्पाचे परीक्षण करताना प्रकल्प मांडण्याची पद्धत, विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि त्याचा व्यवहारातील उपयोग व त्यास लागणारा खर्च अशा महत्त्वपूर्ण मुद्दे विचारात घेण्यात आले असे प्रा. सौ. एन. व्ही. वडेर यांनी कळवले आहे.

**प्रकल्प यादी :**

- Wireless Power Transmission
- Energy Conservation in Traction
- Solar Robotic Tractor
- Power Generation by solar Chimney
- Vertical axis Wind mill
- Electromagnetic Induction Wireless Powercommunication
- Multi Parameter data acquisition system of an air craft
- Ring Substation automation via SCADA
- Energy Conservation in Railways
- Smart Energy Management in Commercial Building
- Multi -talented Robot
- Solar Energy System for rural development

☆ **तंत्रनिकेतनाच्या नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन.**

तंत्रनिकेतनाच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या कार्यालयाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते गुरुवार दि.१७ मार्च रोजी दुपारी १.०० वाजता तंत्रनिकेतन बिल्डिंग, पहिला माळा येथे करण्यात आले.

याप्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे जेष्ठ सदस्य एस.व्ही.करंदीकर, खजिनदार मा.य.गोखले, प्राचार्य, दि.कृ.नायक, जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे प्राचार्या शकुंतला सिंग, महाविद्यालय परीसरातील प्राचार्य, तंत्रनिकेतनमधील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

सदरचे कार्यालय हे सुसज्ज व संगणकीकृत असे बनविण्यात आले आहे.

☆ तंत्रनिकेतनमध्ये मंगळवार दि. ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून तंत्रनिकेतनमधील सर्व महिलांनी एकत्र येऊन हा दिवस उत्साहात साजरा केला.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अंजली एस. गांगण, B.sc (OT) P.G.D.R. (Rehabilition Therapist & Yoga Therapist) उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. सौ. कीर्ती आगाशे यांनी करून दिली. कार्यक्रमाला प्राचार्य अंजली गांगण यांनी विविध आजारपणाविषयीची आणि योगसाधनेची माहिती उपस्थितांना करुन दिली. कार्यक्रमाला बहुसंख्य माहिला उपस्थित होत्या.

आभार प्रदर्शन प्रा. सौ. गीताली इंगवले यांनी केले.

वृत्तसंकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

●●●

## विजेची बचत

गेल्या सहा-सात वर्षांत महाराष्ट्रात विजेची मागणी व पुरवठा यांत मोठी तफावत पडली आहे. त्याचा परिणाम शहरी औद्योगिकीकरणापेक्षाही ग्रामीण कृषी व कृषी औद्योगिकीकरणावर झालेला आहे. वीजनिर्मिती अधिक प्रमाणावर कशी करता येईल, हा एक स्वतंत्र विषय आहे. परंतु, घरगुती स्तरावर व अन्य ठिकाणी विजेची बचत कशी करता येईल, हा आपल्यासमोर प्रश्न आहे. विजेची बचत हीच विजेची निर्मिती आहे, हे पटल्यास विजेच्या बचतीचे सुचविलेले उपाय फलदायी ठरतील. वीज राष्ट्रीय संपत्ती मानून सर्वांच्या एकत्रित सहभागाने व सहविचाराने विजेची मागणी कमी करण्यात यश मिळू शकेल.

-संग्रहातून

## डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्याने

डॉ. वा. ना. बेडेकर यांचा १४ एप्रिल हा स्मृतिदिन. या दिवशी विद्या प्रसारक मंडळातर्फे त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विशेष व्याख्यान आयोजित करण्यात येते. यंदा सहावा स्मृतिदिन होता या आधी झालेल्या व्याख्यानांचा तपशील -

- **प्रथम स्मृतिदिन :**

**विषय** : भारत आणि संगणक
**वक्ता** : डॉ. दीपक फाटक

- **द्वितीय स्मृतिदिन :**

**विषय** : जागतिक अर्थकारणात आशियाई वर्चस्वासाठी शिक्षणाचे महत्त्व
**वक्ता** : प्रा. वाय. के. भूषण

- **तृतीय स्मृतिदिन :**

**विषय** : जागतिकीकरण आणि भारतीय अर्थकारण परिणाम आणि दिशा
**वक्ता** : डॉ. विष्णू कान्हेरे

- **चतुर्थ स्मृतिदिन :**

**विषय** : भारतीय दर्शनशास्त्रामधील घटितार्थशास्त्र आणि विरचना
**वक्ता** : डॉ. आर. बाळसुब्रमनियन

- **पाचवा स्मृतिदिन :**

**विषय** : विज्ञान आणि समाज : वसाहतवादाच्या पार्श्वभूमिवर घ्यायचा बोध
**वक्ता :** डॉ. दीपक कुमार

- **सहावा स्मृतिदिन :**

**विषय** : ऐतिहासिक दृष्टीकोनातून भारतीय विज्ञान व धर्म
**वक्ता :** प्रा. वी. व्ही. सुब्बारायप्पा

(मुखपृष्ठावरून )

**संपादकीय**

समाजाचे ते लक्षण आहे. सगळ्या पक्षांतील भ्रष्ट नेत्यांची संख्या काही हजारांत असेल, चिरीमिरी मागणाऱ्या कार्यालयांतील शिपायापासून मंत्रालयातील भ्रष्ट नोकरशहाची संख्या काही लाखांनी आहे, तर 'आर्थिक' किंवा 'मागासले'पणाची कुठलीही खरी 'पात्रता' नसतांना याच आधारावर सवलती 'स्वाहा' करणाऱ्यांची संख्या काही कोटींनी आहे.

आपल्या सगळ्या 'धार्मिक' सणांचा आपण एकच सण करून टाकला आहे; तो म्हणजे 'शिमगा'. दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव या सगळ्या सणांचे आता राजकारण्यांनी अपहरण केले आहे. घसा बसेस्तोवर 'गरिबी'च्या नावाने कंठशोष करणारे हे नेते, लाखो रुपयांची उधळण अशा निरर्थक सोहळ्यांवर करतात. या सगळ्या सोहळ्यांत 'विदुषकी' नाच करण्यात हीच टीका करणारी प्रजा सामील असते. रस्त्यावरचे अतिक्रमण असो किंवा बेकायदा गिळंकृत केलेल्या झोपडीपासून, घरांपर्यंतचा प्रश्न असो, हेच राजकीय नेतृत्व त्याला निर्लज्ज पाठिंबा देत असते. नापासांना पास करा, वर्गात अपुरी उपस्थिती असली तरी परीक्षेला बसू द्या, परिक्षेत नक्कल करणाऱ्यांना छुपेपणाने सोडण्यासाठी मदत करा, रास्ता रोको, रेल रोको, तोंडाला काळे फासणे अशा तद्दन गुंडगिरीच्या पाठीशी हेच राजकीय नेतृत्व 'हिमालया'सारखे उभे असते. असल्या चळवळीपासून 'फायदा' करून घेणारी ही प्रजा, 'राजा' आणि 'कलमाडीं'एवढीच भ्रष्टाचारी आहे.

कोणता 'लोकपाल' याला आळा घालू शकणार आहे? कुणाची फसवणूक आपण करतो आहोत? सध्या 'लोकशाही'चा विजय म्हणजे 'संख्याबळा'चा विजय आहे. एखाद वेळेस 'सुसंस्कृत' एकाधिकारशहा समाजाचे भले करू शकेल, पण 'असंस्कृत' नागरिकांची लोकशाही १००% 'आराजक'च निर्माण करू शकते. असे आराजक म्हणजे 'स्वातंत्र्या'चा विजय नसतो. मूल्यहीन, चारित्र्यहीन समाजाच्या 'स्वातंत्र्या'ची संकल्पना म्हणजे 'स्वैराचार'च असतो. साहित्य अणि कलेतील 'सृजनशील'ता जेव्हा आटते, तेव्हा बीभत्सपणा व नग्नता यांची गरज निर्माण होते. आज गरज आहे ती चारित्र्याच्या संवर्धनाची. अशा चरित्र्यशील नागरिकांची संख्या जेव्हा वाढेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'परिवर्तना'स सुरुवात होईल. आपल्या 'धर्म' संकल्पनेत या चारित्र्य रक्षणाचे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. 'पंचतंत्रा' तील कथा आणि भर्तृहरीची 'नीती शतके'याच धर्माचा भाग आहेत. चारित्र्य घडवायला सहस्त्रावधी वर्षे लागतात, तर बिघडवायला काही दशके पुरतात. 'धर्म' म्हंटले की 'फेफरे' भरणाऱ्या या नेतृत्वाला हे कोण समजावून सांगणार?

'रामायण' व 'महाभारत' या महाकाव्यांची निर्मिती हीच मुळी अशा 'सुसंस्कृत' समाजाच्या निर्मितीकरता आहे. या कथाच मुळी धर्म आणि अधर्माच्या संघर्षाच्या आहेत. भारतीय साहित्य, कला आणि तत्त्वज्ञानाच्या मुळाशी ही महाकाव्ये बीजासारखी रुजली आहेत. रामायणातील 'रावण' हा दशग्रंथी ब्राह्मण, तर महाभारतातील 'कर्ण' हा दानशूर होता. पण या दोन्ही व्यक्तिरेखा त्यांच्या या गुणांमुळे अनुकरणीय ठरल्या नाहीत. त्याचे कारण म्हणजे त्यांनी केलेल्या 'अधर्मा'चा पाठपुरावा. पण आजच्या मराठी साहित्याला अचानक कर्णावरील 'अन्याया'चा साक्षात्कार होतो. कल्पनाविलास कोणीच रोखू शकत नाही. म्हणूनच कथा कादंबऱ्यात रंगवलेली आणि महाकाव्यतील ही 'व्यक्तिमत्त्वे' यांच्या मध्ये फारकत आहे. येथेच भ्रष्टाचाराची खरी सुरुवात होते आणि 'मूल्यहीन' समाजाची 'मशागत' यामुळेच होत असते.

याचा परिणाम आज आपण पाहातच आहोत. म. गांधी, जयप्रकाश, हजारे यांच्याबद्दल संपूर्ण आदर बाळगूनही असे म्हणावेसे वाटते, की, शाश्वत सामाजिक परिवर्तनाकरता हे नेतृत्व थिटे पडले आहे. आजचा लढा हा मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीसाठी हवा, पण या लढ्याची सुरुवात झाल्याचे कुठेच दिसत नाही. बाकी सर्व 'लढे' हे म्हणूनच अल्पायुषी व समाजात 'गुणात्मक' बदल घडवण्यास निरुपयोगी ठरतात. हे आपल्याला उमगले, तरी देखील ती परिवर्तनाची एक सुरुवातच आहे असे म्हणावे लागेल.

●●●



## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वागयज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।। १ ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२ ।।
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।
चलां कल्पतरुं चे आरव । चेतना चिन्तामणीचें गांव । बोलते जे आर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखी । अखंडीत ।।७ ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकी इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।। ८ ।।
येथ म्हणें श्रीविश्वेंशरावों । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। ९ ।।

## ❈ पसायदानाचा गद्य अर्थ ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, की, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयीः**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी

स्वंतत्र वास्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

(१४ एप्रिल हा डॉ. वा. ना. बेडेकर यांचा स्मृतिदिन. त्यानिमित्ताने - संपादक)

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म (शनिवार व महाशिवरात्र होती.) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२-४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ |
| १९४४ | विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला. याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३नोव्हें.) |
| १९४७ | डॉ. विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर) |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे) |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम |
| १९५२-५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना |
| १९५७ | विद्या प्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथ. विभाग) प्रारंभ |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढविली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात |
| १९७५ | विज्ञान महाविद्यालयाचे विभक्तीकरण |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल) |
| १९८३ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले. |
| १९९९-२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २०००-२००१ | जोशी-बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास) |

(संकलन श्री. शरद ललित)



# स्वप्न साकारत आहे...

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*
*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल–सागर–सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

– डॉ. वा. ना. बेडेकर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.